❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com   Epaper - www.sandhyaepaper.com   www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## महाराष्ट्र-हेसन भागीदारीतून गुंतवणूक, नवोन्मेष, रोजगार आणि
# कौशल्य विकासाला चालना मिळेल

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
■ महाराष्ट्र आणि हेसन दरम्यान परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सामंजस्य करार


■ मुंबई (दै. संध्या)

जर्मनीतील हेसन राज्य आणि महाराष्ट्र यांच्यातील भागीदारी ही दोन आर्थिक सक्षम राज्यांमधील सहकार्य आहे. हेसन हे महाराष्ट्रासाठी जर्मनी आणि युरोपमधील तर महाराष्ट्र हे हेसनसाठी भारत आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशातील प्रवेशद्वार ठरेल, महाराष्ट्र-हेसन भागीदारीतून गुंतवणूक, नवोन्मेष, रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना मिळेल आणि नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र आणि हेसन मधील परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत परस्पर सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हेसन राज्याचे अध्यक्ष बोरीस ऱ्हेइन यांनी स्वाक्षरी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बळगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, कौशल्य विकास आयुक्त अमित सैनी,



सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे यांच्यासह जर्मनीच्या हेसन राज्याचे शिष्टमंडळ उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विश्वास, ज्ञान, व्यापार, नवोन्मेष आणि लोकांमधील संबंधांच्या भक्कम पायावर भारत-जर्मनी भागीदारी उभी आहे. राष्ट्रीय स्तरावरील सहकार्याला आता राज्यस्तरावरील आर्थिक भागीदारीची जोड मिळत असून महाराष्ट्र आणि हेसन या दोन्ही राज्यांतील आर्थिक सामर्थ्य, औद्योगिक प्रगती आणि नवोन्मेष क्षमता यामुळे हे सहकार्य अधिक बळकट होणार आहे. फ्रँकफर्ट हे युरोपमधील प्रमुख वित्तीय केंद्र असून मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. वित्त, उद्योग, तंत्रज्ञान, संशोधन आणि कुशल मनुष्यबळ या क्षेत्रांतील सामर्थ्यामुळे फ्रँकफर्ट आणि मुंबई परस्परांच्या अर्थव्यवस्थांचे प्रवेशद्वार बनू शकतात, असे मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्राला जगातील अग्रगण्य गुंतवणूक व नवोन्मेष केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, हेसनमधील उद्योगसमूह या प्रवासातील महत्त्वाचे भागीदार ठरू शकतात. युरोपियन युनियन-भारत मुक्त व्यापार करारामुळे व्यापार आणि गुंतवणुकीसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण झाले असून त्याचा लाभ यंत्रसामग्री, रसायने, औषधनिर्मिती, वैद्यकीय तंत्रज्ञान, वाहन उद्योग तसेच महाराष्ट्रातील उत्पादन आणि जीवन विज्ञान क्षेत्रांना होईल. करारात उद्योग, सेवा, माहिती तंत्रज्ञान तसेच कुशल मनुष्यबळ व सीमापार गतिशीलता या चार प्रमुख क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. औषधनिर्मिती, आरोग्यसेवा, अभियांत्रिकी, वाहन उद्योग, वित्तीय सेवा, लॉजिस्टिक्स, डिजिटल अर्थव्यवस्था आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांमध्ये व्यापक सहकार्याच्या संधी उपलब्ध आहेत. हेसनमधील उद्योगांनी महाराष्ट्रात अधिक गुंतवणूक करावी तसेच महाराष्ट्रातील उद्योगांनी जर्मनी आणि युरोपियन बाजारपेठेत प्रवेशासाठी हेसनचा उपयोग करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### मुलाला वाचवताना आई-वडिलांचाही मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : दैनिक संध्या

छत्रपती संभाजीनगरमध्ये शुक्रवारी एका मुलासह त्याच्या आई-वडिलांचा डोंगरावरुन पडून दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली. छत्रपती संभाजीनगरच्या तिसगाव भागातील खवड्या डोंगरावर एक 18 वर्षाचा मुलगा आत्महत्या करायला गेला होता. त्यावेळी त्याचे आई-वडील आणि स्थानिक लोक त्याला वाचवण्यासाठी डोंगरावर गेले. आई-वडील आणि इतर लोक त्या मुलाला उडी मारु नकोस, असे समजावत होते. मात्र, मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. वडील आपल्या मुलाची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते. अखेर वडिलांनी पुढे जात मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मुलाने डोंगरावरुन उडी टाकली होती, त्याला पकडण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही खाली तोल जाऊन तेदेखील खाली पडले. हे दोघेही डोंगराच्या दरीत खाली पडताच त्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार पाहून शोक अनावर झालेल्या मुलाच्या आईनेही डोंगरावरुन खाली उडी मारली. त्यामुळे तिचाही मृत्यू झाला. या घटनेने घटनास्थळी उपस्थित असलेल्या सर्वांनाच धक्का बसला. मुलाने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. कुणाल मुरलीधर चांदवडे,मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. हे सर्वजण देवळाई सातारा परिसर येथील असल्याची माहिती समोर आली आहे.

### टोलनाक्याजवळ कट मारण्यावरुन वाद


सातारा : दैनिक संध्या

साताऱ्यातील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आनेवाडी टोलनाक्याजवळ कट मारण्याच्या वादातून युवकाला कारच्या दरवाजाला लोंबकळत घेऊन तब्बल 3 किलोमीटर फरफटत नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. पाठलाग करून संतप्त जमावाने नागेवाडी हद्दीत कार अडवली. त्यानंतर कारची तोडफोड करत कारमधील दोघांना चांगलाच चोप देण्यात आला. सातारा तालुका आणि भुईंज पोलिसांच्या हस्तक्षेपाने मोठा अनर्थ टळला असून दोन्ही संशयितांना पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले. सातारा येथील आनेवाडी टोलनाक्याजवळ किरकोळ वादातून घडलेल्या थरारक घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. कट मारण्याच्या वादातून कार थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका युवकाला कारच्या दारात घेऊन तब्बल तीन किलोमीटर फरफटत नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेनंतर संतप्त जमावाने कारचा पाठलाग करत नागेवाडी हद्दीत कार अडवली. युवकाची सुटका केल्यानंतर जमावाने कारची तोडफोड केली आणि कारमधील दोघांना चोप दिला. दरम्यान, सातारा तालुका आणि भुईंज पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी कारमधील दोन्ही संशयितांना ताब्यात घेतलं असून, या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. मुंबई-बंगळुरु महामार्गावरील वाकड पुलावर ओव्हरटेकच्या वादातून दोन वाहनचालकांमध्ये हाणामारी झाल्याची घटना घडली. ओव्हरटेक करताना वाहनाला धक्का लागल्याने वादाला सुरुवात झाली. त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये हाणामारी झाल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. काहींनी मध्यस्ती केल्यानं वाद निवळला. त्यानंतर वाहतूक पूर्वपदावर ही आली.

## धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर आता अभिजीत दिपकेंचा मोर्चा दादा भुसेंकडे

■ लातूर (दै. संध्या)

महाराष्ट्रातील शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर याची जबाबदारी नेमकी कोणाची?, असा सवाल उपस्थित करून शिक्षण व्यवस्थेची ही अवस्था पाहता राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी प्रतिक्रिया कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील उजनी इथल्या जिल्हा परिषद शाळेला भेट दिल्यानंतर ते बोलत होते.



शिक्षणमंत्र्यांनी आणि आमदारांनी स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी आधी जिल्हा परिषद शाळेत पाठविले पाहिजे, असेही ते म्हणाले. महाराष्ट्रातील शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील तर याची जबाबदारी नेमकी कोणाची असा सवाल उपस्थित करून शिक्षण व्यवस्थेची ही अवस्था पाहता राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी प्रतिक्रिया अभिजीत दिपके यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातल्या उजनी येथल्या जिल्हा परिषद शाळेला भेट दिल्यानंतर ते बोलत होते आणि शिक्षण मंत्र्यांनी आणि आमदारांनी स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी आधी जिल्हा परिषद शाळेत पाठवलं पाहिजे असं देखील ते म्हणालेत. पत्रे आहेत आणखी शाळांवर? ते पत्रे गळत आहेत. मुलांना बसायला बेंच नाही आहे. तर दहा वर्षात तुम्हाला तेही जमलं नसेल तर मग तुम्ही केलं काय? दादा भुसेंनी राजीनामा दिला पाहिजे, शाळेची अवस्था बघून तर मला नाही वाटत त्यांनी या पदावर राहावं, राजीनामा दिला पाहिजे, राजीनामा दिलाच पाहिजे कारण की, शाळांची अवस्था बघून तर मला नाही वाटत की, शिक्षण मंत्री कोणी असलं पाहिजे आणि जर त्यांना शिक्षण मंत्री बनायचं असेल, बनून राहायचं असेल स्वतःच्या मुलांना उद्यापासून सरकारी शाळेत पाठवा, त्या अवस्थेत तुमच्या मुलांनाही शिकू द्या असंही पुढे दिपकेंनी म्हटलं आहे. औसाच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत खाजगी शाळेचे विद्यार्थी देखील आढळून आले. अभिजीत दिपकेंच्या समोरच विद्यार्थ्यांनी याबाबतची कबुली दिली आहे. औसा शहरात असलेली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे खासगी शाळा पीपल्स प्रायमरी स्कूलचे विद्यार्थी आढळून आले आहेत. स्कूल ठीक करो अभियानांतर्गत अभिजीत दिपके यांनी सुरू केलेल्या अभियानात ही माहिती आढळून आलेली आहे.

## देशात सत्ताबदल नक्की होईल, पण तो काँग्रेस पक्षामुळे नव्हे तर नरेंद्र मोदींमुळेच होईल

■ मुंबई (दै. संध्या)

आगामी काळात देशात सत्ताबदल नक्की होणार आहे. तो आमच्यामुळे होणार नाही, काँग्रेस किंवा कोणत्या राजकीय पक्षामुळे होणार नाही. तर हा बदल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच होईल. याला कारण त्यांचा गेल्या 12 वर्षातील कारभार आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. ते शुक्रवारी नाशिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. 2029 ला मोदी पंतप्रधान होणार नाहीत. त्यामुळे आता चेहरा बदलण्याचा प्रयत्न आहे. अमित शहा यांना उपपंतप्रधान व्हायचे आहे, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे. केंद्रात सत्ताबदल व्हायचा तेव्हा होईल. पण देशाचा पुढचा पूर्णवेळ शिक्षणमंत्री कोण असणार, हा मोदी सरकारच्या उर्वरित काळातील महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे. प्रल्हाद जोशी यांच्याकडे सध्या शिक्षणखात्याचा चार्ज दिला आहे. त्यांच्याकडे अगोदरच तीन महत्त्वाची खाती आहेत. त्यामध्ये आता ही नवीन जबाबदारी त्यांना दिली आहे. शिक्षण खातं हे पूर्णवेळ मंत्र्याची गरज असलेलं खातं आहे, पार्टटाईम खातं नाही. त्यामुळे लवकरच मोदी देशाला चांगला शिक्षणमंत्री देतील, ही अपेक्षा आहे. देशाला अशा शिक्षणमंत्र्यांची गरज



आहे, जो विद्यार्थ्यांचे प्रश्न समजावून घेऊ शकतो, परीक्षाव्यवस्थेतील गोंधळ कमी करु शकेल. ज्याला मुलभूत शिक्षणाचे प्रश्न माहिती आहेत, अशा शिक्षणमंत्र्याची गरज आहे. मात्र, आजघडीला मोदी सरकारमध्ये तशी एकही व्यक्ती नाही. देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत बढती मिळणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. मात्र, फडणवीस शिक्षणमंत्री झाले तर आम्हाला चालणार नाही, आम्ही त्याला विरोध करणार. महाराष्ट्रातही मोठ्याप्रमाणावर पेपरफुटी झाली आहे. फडणवीस शिक्षण मंत्रीपदासाठी उपयुक्त नाहीत.

## दिल्ली पेलेट गन हल्ला प्रकरण : राहुल गांधींच्या आंदोलनाला यश

■ मुंबई (दै. संध्या)

जंतर मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पेलेट गनच्या हल्ल्यात जखमी झालेल्या एका विद्यार्थ्याच्या समर्थनार्थ काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याबाहेर धरणे आंदोलन सुरु केले आहे. या प्रकरणात एफआयआर दाखल करण्याची मागणी राहुल गांधी यांनी केली आहे. तसेच पोलिसांच्या अपयशाबद्दल नाराजी देखील व्यक्त केली आहे. दरम्यान, गेल्या पाच तासापासून सुरु असलेल्या राहुल गांधी यांच्या धरणे आंदोलनाला यश आलं आहे. दिल्ली पोलिसांनी राहुल गांधी यांची मागणी मान्य केली आहे. अखेर एफआयआर दाखल करण्यास पोलिसांनी तयारी दर्शवली आहे. दरम्यान, गेल्या पाच ते साडेपाच तासांपासून राहुल गांधी यांनी जखमी विद्यार्थ्याबरोबर आंदोलन सुरु केले होते. अखेर या आंदोलनाला यश आलं आहे. पोलिसांनी FIR दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. दरम्यान, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या राजवटीत शांततेने आंदोलन करणाऱ्या तरुणांवर उघडपणे पेलेट गनने गोळीबार केला जाऊ शकतो, पण त्यांना न्याय मिळू शकत नाही असी टीका राहुल गांधी यांनी केली होती. तसेच जोपर्यंत एफआयआर नोंदवला जात नाही, जोपर्यंत दोषींवर कठोर कारवाईची आम्हाला खात्री मिळत नाही, तोपर्यंत




आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम राहू. आमचे ध्येय न्याय आहे आणि तो आम्ही कोणत्याही परिस्थितीत मिळवू असे राहुल गांधी यांनी सांगितले होते.

दरम्यान, 20 जुलै 2026 रोजी नवी दिल्लीतील संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान विद्यार्थी आंदोलकांवर रॅपिड ॲक्शन फोर्सने पेलेट गनचा वापर करण्यात आला होता. या हल्ल्यात साहिल लोचव हा तरुण व इतर काही जण गंभीर जखमी झाले होते. पीडित तरुणाच्या शरीरात 200 हून अधिक छर्रे व डोळ्यात 3 छर्रे रुतल्याचा वैद्यकीय अहवालात दावा करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी आक्रमक झाले होते. एफआयआर दाखल करण्यासाठी राहुल गांधी यांनी गेल्या पाच तासापासून धरणे आंदोलन सुरु केले होते. अखेर पेलेट गन प्रकरणात एफआयआर दाखल करण्यास दिल्ली पोलीस तयार झाले आहेत. राहुल गांधी गेल्या पाच तासांपासून पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्याच्या मागणीवर ठाम होते. दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींची मागणी मान्य केली आहे. पोलीस अज्ञात व्यक्तींविरुद्ध एफआयआर दाखल करत आहेत.

# साखरेच्या दरात पुन्हा ऐतिहासिक वाढ

■ मुंबई (दै. संध्या)

सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेनं मोठी उसळी घेतल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या साखरेच्या वाढत्या दराचा ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. सध्या साखरेच्या इतिहासात सर्वात मोठी वाढ झाली आहे.

साखर 7 हजार 500 प्रति क्विंटलवर गेली आहे. तर वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर 80 रुपयांवर गेले आहेत. याचा ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, आगामी काळात साखरेच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे साखरेच्या वाढत्या दराचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर होण्याची शक्यता आहे. हिंगोलीत साखरेचे दर तब्बल 75 रुपये किलोपर्यंत पोहोचलेत. साखरेच्या दरात झालेली ही मोठी वाढ आता थेट मिठाई व्यवसायाच्या गणितावर परिणाम करू लागली आहे. कारण मिठाई तयार करण्यासाठी साखर हा सर्वात महत्त्वाचा आणि मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा घटक आहे.



### ऐन सणासुदीच्या काळात महागाईची झळ

### साखरेचे दर पुढच्या दोन महिन्यांमध्ये वाढवायचे आधीच ठरलेलं

सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या साखरेच्या वाढत्या दराचा ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. सध्या साखरेच्या इतिहासात सर्वात मोठी वाढ झाली आहे. साखर 7 हजार 500 प्रति क्विंटलवर गेली आहे. तर वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर 80 रुपयांवर गेले आहेत. याचा ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. साखर दरवाढीनंतर आता शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी काही सवाल उपस्थित करत सरकारकडे मोठी मागणी केली आहे. साखरेची अचानक झालेली दरवाढ संशयास्पद आहे, साखरेचे दर वाढले तर माझ्यासारख्या नेत्याला आनंद झाला असता, मात्र हे पैसे शेतकऱ्यांना नाहीतर व्यापाऱ्यांच्या घशात जाणार आहेत, दिवाळीपर्यंत पुरेल इतका साखरेचा साठा यंदाच्या हंगामातील आहे आणि पुढील उत्पादन देखील देशाला पुरेल इतकं असताना अचानक दर कसे काय वाढले असा प्रश्नही त्यांनी केला आहे. अचानक साखरेच्या दरांमध्ये जे काही उसळी घेतलेली आहे, ती कुठंतरी संशयास्पद आहे. कारण यावर्षी एकूण पीक पाहणी पाहता, पुढील सिझनमधे देशाला पुरेल इतकं साखरेचं उत्पादन होणार आहे हे तर स्पष्ट आहे. पुढे राजू शेट्टी यांनी बोलताना म्हटलं की, साखर कारखानदारांनी आम्ही आधीच साखर विकून टाकलेली आहे आणि आमच्याकडं आता फारशी साखर शिल्लक राहिलेली नाही असा कांगावा करायला सुरुवात केलेला आहे.

त्यामुळे साखर महागली आणि मिठाई विक्रेत्यांचा उत्पादन खर्चही वाढला आहे. याचा परिणाम मिठाईच्या दरांवर होण्याची शक्यता आहे. हिंगोली शहरातील मिठाईच्या दुकानांमध्ये सकाळपासूनच विविध प्रकारच्या मिठाई तयार करण्याची लगबग पाहायला मिळते. पेढे, बर्फी, गुलाबजामुन, जिलेबी, लाडू अशा अनेक मिठाई तयार करताना मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर केला जातो. मात्र, साखरेचे दर वाढल्याने आता मिठाई विक्रेत्यांच्या खर्चाचा ताळमेळ बिघडला आहे. पूर्वी ज्या प्रमाणात साखरेसाठी खर्च होत होता, त्यापेक्षा आता त्याच उत्पादनासाठी अधिक पैसे मोजावे लागत आहेत. साखरेच्या दरवाढीचा थेट परिणाम केवळ मिठाई विक्रेत्यांवरच नाही, तर ग्राहकांच्या खिशावरही होण्याची शक्यता आहे. कारण उत्पादन खर्च वाढल्यास मिठाईचे दर वाढवण्याशिवाय पर्याय नसल्याचं विक्रेत्यांचं म्हणणं आहे.

- सांगली- 80 रुपये किलो
- बुलढाणा- 80 रुपये किलो
- वाशिम- 80 रुपये किलो
- कोल्हापूर-75 रुपये किलो
- नाशिक- 75 रुपये किलो
- पुणे - 72 रूपये किलो
- परभणी- 70 रुपये किलो
- सातारा- 70 रुपये किलो
- पालघर- 70 रुपये किलो
- भंडारा - 70 रुपये किलो
- जळगाव - 68 रुपये किलो
- अकोला- 65 रूपये किलो
- रत्नागिरी - 62 रुपये किलो
- चंद्रपुर - 60 रुपये किलो
- नांदेड - 65 रुपये किलो
- पालघर - 65 ते 70 रुपये प्रति किलो
- लातूर - 70 रुपये किलो
- हिंगोली - 70 रुपये किलो
- वाशिम प्रति 78 ते 80 रु प्रति किलो
- नागपूर 68 ते 70 रु प्रति किलो
- बुलढाणा 78 रु ते 80 रु प्रति किलो
- गोंदिया 70 रु प्रति किलो
- भंडारा 68 रु प्रति किलो
- वर्धा 62 ते 64 रुपये प्रति किलो
- अकोला 65 रुपये प्रति किलो
- चंद्रपूर 60 प्रति किलो
- अमरावती 75 रु प्रति किलो
- यवतमाळ 75 ते 78 रु प्रति किलो
- गडचिरोली 60 रुपये प्रति किलो

## राष्ट्रवादीला चुकीच्या बॉक्समध्ये बसवतात

■ मुंबई (दै. संध्या)

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी शरद पवारांना टोला लगावल्यानंतर त्यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. मनुस्मृतीवाद्यांसोबत जाऊ नका, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले होते. त्यावर राज्यातील काँग्रेसचे नेते राष्ट्रवादीला चुकीच्या बॉक्समध्ये बसवतात, कदाचित केंद्रातील काँग्रेस नेत्यांसोबत त्यांचे समन्वय नसावे, असा टोला सुप्रिया सुळे यांनी लगावला. केंद्रातील काँग्रेस नेत्यांसोबत आमचा सातत्याने संवाद असतो, मात्र राज्यातील काँग्रेस नेते राष्ट्रवादीला नेहमी चुकीच्या बॉक्समध्ये बसवतात. महाराष्ट्र आणि दिल्लीतील काँग्रेस नेत्यांच्या संवादात गॅप असल्याचं सुप्रिया सुळे म्हणाल्या. शरद पवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा संघटनात्मकदृष्ट्या सुप्रीम कोर्टात अद्याप लढाई लढत आहे. इलेक्शन कमिशनमध्ये भलेही अजित पवार गट जिंकला असेल, परंतु सर्वोच्च न्यायालयात आमची ही नैतिकतेची लढाई सुरूच राहील, असे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले. पक्षाचे संविधान आणि मालकी शरद पवारांकडेच असून पक्ष काढून दुसऱ्याला देणे हा पवारांवर झालेला मोठा अन्याय असल्याचे त्यांनी सांगितले. बीडमधील विलास घुले प्रकरणात खासदार बजरंग सोनावणे यांच्या मुलाला आरोपी करण्याची मागणी केली जात आहे. यावर बोलताना सुप्रिया सुळे आक्रमक झाल्या. "गलिच्छ राजकारण घरापर्यंत आणू नका. चुकीच्या पद्धतीने खोट्या केसेस दाखल केल्या तर आम्ही ते सहन करणार नाही.

# संपादकीय

## निकालाची वेळ

**अंतिम निकालाला विलंब होणार हे स्पष्ट असल्यास न्यायालयाने मूळ राजकीय किंवा संस्थात्मक स्थिती जशी आहे तशी ठेवण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आखली पाहिजेत.**

सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंबंधीच्या सुनावणीकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. उद्धव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाचा निर्णय, मूळ राजकीय पक्षाचे अस्तित्व, विधिमंडळ पक्षाचे बहुमत आणि पक्षांतरानंतर पक्षावर दावा करता येतो का, असे महत्त्वाचे घटनात्मक मुद्दे मांडले आहेत. या खटल्याने मात्र त्यापेक्षा मोठा प्रश्न देशासमोर आणला आहे.

एखाद्या घटनात्मक वादाचा निकाल इतक्या उशिरा लागला की दरम्यान मूळ परिस्थितीच अपरिवर्तनीय झाली, तर नंतर मिळालेल्या न्यायाचे प्रत्यक्ष मूल्य किती उरते? घटनेतील दहावी अनुसूची पक्षांतर रोखण्यासाठी आहे. तिच्या परिच्छेद ६ नुसार अपात्रतेच्या प्रश्नाचा निर्णय विधानसभा अध्यक्ष करतात. किहोतो होल्लोन विरुद्ध झाकिल्लू या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांचा निर्णय घटनात्मक न्यायालयांच्या न्यायालयीन पुनरावलोकनापासून मुक्त नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर नाबाम रेबिया वि. उपसभापती या प्रकरणात पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने महत्त्वाचे तत्त्व मांडले—विधानसभा अध्यक्षांना हटविण्याचा ठराव विचाराधीन असताना त्यांनी दहाव्या अनुसूचीखालील अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देऊ नये. पुढे केशम मेघचंद्र सिंग विरुद्ध सभापती या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने, अपवादात्मक परिस्थिती वगळता, पक्षांतरबंदीच्या याचिकांचा निर्णय साधारण तीन महिन्यांत व्हावा, असे म्हटले. कारण विधानसभेचा कार्यकाळच पाच वर्षांचा असताना अपात्रतेचा निर्णय वर्षानुवर्षे प्रलंबित राहिला, तर कायद्याचा मूळ उद्देश निष्प्रभ होऊ शकतो. म्हणजेच पक्षांतरबंदी कायद्याच्या परिणामकारकतेचा आत्माच 'वेळ' आहे. जून २०२२ मध्ये महाराष्ट्रात निर्माण झालेल्या राजकीय संकटात आमदारांची अपात्रता, अध्यक्षांचे अधिकार, राज्यपालांची भूमिका, पक्षाचा आदेश, विधिमंडळ पक्ष आणि मूळ राजकीय पक्षाचे परस्परसंबंध असे अनेक प्रश्न निर्माण झाले. अध्यक्षांविरुद्ध हटविण्याची नोटीस दिली की त्यांच्या अपात्रता ठरविण्याच्या अधिकारावर मर्यादा येते का आणि त्यामुळे पक्षांतरबंदीचा उद्देश निष्प्रभ होतो का, हा देशव्यापी प्रश्न ठरला. मे २०२३ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने सुभाष देसाई वि. प्रधान सचिव, महाराष्ट्र या प्रकरणात अनेक मुद्दे हाताळले आणि नाबाम राबियामधील तत्त्वाच्या अचूकतेचा पुनर्विचार सात न्यायाधीशांच्या मोठ्या पीठाने करावा, असे ठरवले. इथेच घटनात्मक न्यायातील वेळेचे महत्त्व ठळक होते. प्रश्न सात न्यायाधीशांच्या पीठाकडे पाठविण्याइतका मूलभूत आहे; पण अंतिम उलगडा होईपर्यंत ज्या राजकीय परिस्थितीतून तो निर्माण झाला, तीच इतिहासजमा झाली, तर मूळ पक्षकारासाठी न्यायाचे स्वरूप काय उरते? दरम्यान सरकार कार्यरत राहिले, विधानसभेचा कार्यकाळ संपला, महाराष्ट्राने पुढील विधानसभा निवडणूक पाहिली आणि राजकीय समीकरणे बदलली. त्यामुळे आज प्रश्न केवळ 'निकाल काय?' एवढाच नाही; 'त्या निकालाचा मूळ वादावर प्रत्यक्ष उपयोग आता किती?' हाही आहे. सात न्यायाधीशांच्या पीठाचा भावी निर्णय अर्थातच निरर्थक ठरणार नाही. तो भविष्यातील सरकारे, अध्यक्ष आणि पक्षांतराच्या प्रकरणांसाठी महत्त्वाचा न्यायनिदर्शक ठरेल. परंतु २०२२ च्या मूळ घटनात्मक पेचासाठी त्याचे उपचारात्मक मूल्य काळाबरोबर कमी होत जाते. अंतिम निकाल येईपर्यंत घटनात्मक परिस्थिती अपरिवर्तनीय सत्य बनते. हा मोठा विरोधाभास आहे—निकाल देशाच्या भविष्यासाठी मौल्यवान ठरू शकतो; पण ज्या पक्षकाराच्या प्रकरणातून तो निर्माण झाला, त्याच्यासाठी त्याचे प्रत्यक्ष मूल्य जवळजवळ संपलेले असू शकते. शिवसेना प्रकरण एकमेव नाही. निवडणूक रोखे योजनेविरुद्धची याचिका २०१७ मध्ये दाखल झाली. योजना अनेक वर्षे सुरू राहिली. अखेर फेब्रुवारी २०२४ मध्ये पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने ती असंवैधानिक ठरवली आणि राजकीय निधीची माहिती न देणे हे नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे स्पष्ट केले. निकाल ऐतिहासिक होता; पण २०१७ ते २०२४ दरम्यान निर्माण झालेले राजकीय परिणाम मागे फिरवता आले का?

## संस्कृत सुभाषित

'बीज तेचि फळ येईल शेवटी। लाभ हानी तुटी ज्याची तया ।।

अर्थ : जे पेराल तेच उगवते आणि लाभ व हानी ही ज्याची त्याची वेगवेगळी असते म्हणून सत्कर्म करा, सद्विचाराने चाला.

## गुरु वचन

### परमेश्वराचे नामस्मरण करा

मानवी शरीर परमेश्वराच्या कृपेने आणि केवळ परमेश्वराच्या प्राप्तीसाठीच मिळते. यासाठी सर्व काम सोडून परमेश्वराचे नामस्मरण करायला हवे. ज्यांचे वय जास्त झाले आहे, त्यांना परमेश्वराचे नामस्मरण करणे आहेच, पण ज्यांचे वय कमी आहे, त्यांनीही स्वच्छ मनाने परमेश्वराचे नामस्मरण करावे लागणार आहे. सृष्टीतील सर्व कामे करायची आहेत पण आपला मुख्य हेतू आणि लक्ष्य केवळ परमेश्वराला प्राप्त करणे असावे. अस्तित्त्वामध्ये सत्ता एका परमात्म्याची आहे. संसाराकडे ध्यान दिले ते सर्व नष्ट होणार आहे आणि निरंतर नष्ट होत राहील. आपण आपल्यापरीने पहायला हवे की, आपण जेव्हा जन्मलो त्यावेळी शरीराची कशी अवस्था होती व आज कशी आहे. संसार नेहमी बदलणारा आहे तर परमात्मा कायमस्वरुपी आहे. परमात्मा आपला आणि आपण परमात्म्याचे आहोत. या दृढता असायला हवी. एखादा लहान मुलाला आईविषयी विचारले तर तो म्हणते ती माझी आई आहे. परंतु आई का आहे याचे तो उत्तर देत नाही. त्याच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की आई त्याची का आहे. आई त्याची आहे याविषयी काही संशय नाही. अशाप्रकारे आपणही संशय करु नका आणि ही गोष्ट पूर्ण विश्वासाने निश्चित करा की, परमेश्वर माझा आहे आणि परमेश्वराशिवाय दुसरे काहीही माझे नाही. कारण ते बाकी सर्व तुम्हाला सोडून जाणार आहेत. ज्याच्याविषयी आपण चिंतेत राहतात. पैसे, घर, जमीन सर्वकाही आहे तिथेच राहणार आहे आणि त्याचे स्मरणही राहणार नाही. स्मरण राहील तर परमेश्वराचे. जर आपल्याला स्मरण राहत असेल तर तुम्ही सांगा आपण या जन्मापूर्वी कोठे होता. आपले आई-वडिल, भाऊ-बहीण, स्त्री-पुरुष आदी कोन होते, आपले घर कोणते होते. जसे पूर्वजन्माची आठवण नाही तसेच या जन्माचीही आपल्याला आठवण राहणार नाही. ज्याची आठवणही होणार नाही, त्यासाठी आपण विनाकारण परेशान होत आहात.

## उपदेशकथा

### देशप्रेम

स्वामी विवेकानंदांच्या मनात भारताविषयी अतोनात भक्ती होती. या देशाच्या उद्धाराचा विचार सदैव त्यांच्या अंत:करणात चालू असे. अमेरिका आणि अन्य पाश्चात्य देशांचा दौरा आटोपून स्वामीजी पुन्हा भारतात यावयास निघाले तेव्हा एका ब्रिटिश मित्राने त्यांना विचारले, आपण गेली चार वर्षे पाश्चात्य जगातली ऐश्वर्यसंपन्न, नेत्रदीपक, शक्तीमान असं आयुष्य अनुभवलं. आता आपल्याला भारतात परत जाताना कसं वाटतं? स्वामीजी म्हणाले, मी येण्यापूर्वी भारतावर माझं खूप प्रेम होतं आता तर भारतातील धुळीचाही प्रत्येक कण, तिथली हवा मला पवित्र वाटत आहे. ती भूमी आता अधिकच पवित्र वाटत आहे.' संन्याशाला असे एखाद्या विशिष्ट देशाविषयी ममत्व का वाटावे? असा प्रश्न त्यांच्या ब्रिटिश मित्राने विचारला असता स्वामीजी म्हणाले की, 'जो स्वदेशावर प्रेम करू शकत नाही, तो विश्व कसे कवेत घेणार? आधी देशप्रेम नि मगच विश्वबंधुत्व!

कथा उपदेश : जो आपल्या मायदेशावर प्रेम करतो. त्यालाच विश्वबंधुत्व साध्य होते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ३०:१३:४०+ |
| २२ ऑगस्ट २०२६ | करण:तैतिल १२:४८:३१ |
| शनिवार | करण:गर २६:००:३७+ |
| विक्रम संवत्- २०८२ | सूर्य:सिंह |
| श्रावण शके | चन्द्र:धनु१४:४८:५२ |
| संवत्- १९४८ | हिजरी सन् - १४४८ |
| संवत्सर - पराभवनाम | मुस्लिम मास - रबिलावल |
| अयन- दक्षिणयन | तारीख - ८ |
| मास- श्रावण | विशेष |
| ऋतु- सौर वर्षा | अश्वत्थमारुती पूजन |
| शुक्ल पक्ष | बऱ्हानपुरे महाराज |
| तिथि:दशमी २६:००:३७+ | पुण्यतिथी - माडगांव |
| नक्षत्र:ज्येष्ठा १४:४८:५२ | (वर्धा) |
| योग:विष्कुम्भ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | 3 | | | 6 | | 1 |
| | 2 | 7 | 8 | | | | 4 | 5 |
| | | | | | 1 | | | 7 |
| 2 | 9 | 4 | | 8 | 5 | | | |
| | 7 | | | 1 | | | 6 | |
| | | | 7 | 3 | | 4 | 8 | 2 |
| 4 | | | 2 | | | | | |
| 6 | 8 | | | | 3 | 7 | 1 | |
| 7 | | 9 | | | 4 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | 2 | 4 | 3 | 9 | 6 | 5 | 1 |
| 5 | 3 | 6 | 1 | 8 | 7 | 4 | 2 | 9 |
| 1 | 9 | 4 | 6 | 2 | 5 | 7 | 3 | 8 |
| 3 | 8 | 5 | 7 | 9 | 6 | 2 | 1 | 4 |
| 2 | 1 | 9 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |
| 6 | 4 | 7 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 |
| 9 | 2 | 8 | 3 | 5 | 4 | 1 | 7 | 6 |
| 7 | 5 | 3 | 9 | 6 | 1 | 8 | 4 | 2 |
| 4 | 6 | 1 | 8 | 7 | 2 | 5 | 9 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६४२ - इंग्लंडमध्ये यादवी युद्धाची सुरुवात.
- १८६४ - जीन हेन्री ड्युनॉट यांनी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटनेची स्थापना केली.
- १८८६ - बुचाचा पोषाख परिधान करून विल्यम केंडालने नायगारा धबधब्याखालचा खळाळता प्रावह पोहून पार केला.
- १९११ - लिओनार्डो दा विंची यांचे सुप्रसिद्ध पेंटिंग 'मोनालिसा' पॅरिसच्या लुव्ह संग्रहालयातून चोरीस गेले.
- १९३२ - बीबीसी दूरचित्रवाणी सेवा नियमित सुरू झाली.
- १९६६ - रशियन अवकाशयान ल्यूना-११ चंद्राच्या दिशेने झेपावले. त्याने चंद्राच्या पृथ्वीवरून दिसत नसलेल्या भागाची चित्रे घेऊन ती पृथ्वीवर पाठवली.
- २००७ - ढाका विद्यापीठात उसळलेला विद्यार्थ्यांच्या हिंसाचारामुळे ढाकासह सहा शहरांमध्ये अनिश्चितकाळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली.

### राष्ट्रीय

- १९०३ - ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा, असे आवाहन पुण्यात विद्यार्थ्यांच्या सभेत लोकमान्य टिळकांनी केली.
- १९२१ - महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाने परदेशी कपड्यांची होळी.

### जन्म

- १९१५ - शंभु मित्र, अभिनेता व नाट्यदिग्दर्शक.
- १९१९ - गिरीजाकुमार माथूर , हिंदी कवी.
- १९३३ - गोपीकृष्ण, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नर्तक.

### निधन

- १८१८ - वॉरन होस्टिंग्ज, ईस्ट इंडिया कंपनीचे गव्हर्नर जनरल.
- १९८२ - एकनाथजी रानडे, विवेकानंद केंद्राचे आद्यप्रवर्तक.

## : SMS :

Tujse dosti karne
ka hisab na aya,
mere kisi bhi sawal
ka jawab na aya,
hum to jagte rahe
tere hi khayalo me,
aur tujhe so
kar bhi hamara
khawab na aya.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.६ | २३.६ |
| अहमदनगर | ३१.९ | २२.७ |
| अकोला | ३४.१ | २५ |
| अमरावती | ३४.२ | २४.८ |
| बीड | ३७.६ | २४.३ |
| भंडारा | ३४.९ | २४.६ |
| बुलढाणा | ४१ | २७ |
| चंद्रपूर | ३७.२ | २४.५ |
| चेन्नई | ४२.३ | ३०.१ |
| नवी दिल्ली | ४३.४ | ३४ |
| धुळे | ३४.७ | २४.९ |
| गोंदिया | ३२.५ | २४ |
| जळगाव | ३३.५ | २५.१ |
| कोल्हापूर | २९.२ | २१.५ |
| लातूर | ३२.३ | २२.२ |
| मुंबई | ३४.२ | ३१.४ |
| नागपूर | ३५.३ | २४ |
| नांदेड | ३४.४ | २४.३ |
| नंदूरबार | ३१.६ | २४.९ |
| नाशिक | ३०.२ | २२.३ |
| पुणे | २८.६ | २२.१ |
| पंढरपूर | ३४.५ | २३.८ |
| सातारा | ३१.१ | २०.७ |
| सांगली | ३२.२ | २२ |
| सोलापूर | ३४.६ | २४.३ |
| वर्धा | ३६.४ | २४.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व राजकीय कामे हातावेगळी होतील. उपयुक्त सल्ला मिळेल.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: पूर्व वाद विवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतुलन बिघडेल. व्यापार मध्यम राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर कार्याचा विस्तार वाढून अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**मिथुन :** शुभ रंग-केसरी, शुभ दिशा:पूर्व मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल.

**धनु :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत.

**कर्क :** शुभ रंग,पांढरा, शुभ दिशा:पूर्व न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तिमत्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**मीन :** शुभ रंग : पिवळा,शुभ दिशा:उत्तर कौटुंबिक किंवा मालमत्ते विषयाच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४७



### आडवे शब्द

१. लढाईतील अस्त्र
४. बहुरूपी
७. जगण्याला गती देणारा पुरातन शोध
९. धंदा
१०. विवाहितेचे घर
१२. लक्ष्मीचे एक नाव
१३. ढगांचा आवाज
१६. ऐटबाट
१८. मार्गक्रमण
१९. सोन्याचांदीचा धागा
२१. लौकिक जग
२२. क्रीडा
२३. शाहिरी गीत
२५. दिवसाचा चोविसावा भाग
२७. दणकट
३०. हाकेला उत्तर
३१. दारावरील खुणेचा आवाज
३२. पुष्कळ
३३. बेहोशीचा आणि अति जागरणचाही परिणाम
३६. विनोबाजींची समोकी गीता
३९. रोखलेली नजर
४०. फसविले जाणे
४२. होडी
४३. शरीरातील वात दूर करणारा
४५. सर
४७. लोखंड घासण्याचे हत्यार
४९. वेळ, मृत्यू
५०. तत्काळ, जागीच
५२. सामन्यातील पराक्रमी
५३. तंबूची कापडी भिंत
५४. तोरा, पत, अब्रू
५५. इंद्रिय
५६. उमटलेली प्रतिक्रिया
५८. पण करणे, अवघड काम तडीस नेण्याचा निश्चय करणे (वा.प्र.)
६१. वेदना, त्रास
६३. मरुत, वाहणारी हवा
६४. टोळीचा प्रमुख
६६. नकारच्या विरुद्ध
६८. धनी
७०. एक लहान गड्डा भाजी
७४. खराब
७६. रंग
७७. धातूचा धागा
७८. कलावंत
७९. प्रतिकूल परिणाम होणे, त्रास होणे

### उभे शब्द

१. नसती उठाठेव करणारा
२. पाण्यावरील हलकीशी लाट
३. खराब
४. नेहमी नशा करणारा
५. बांगड्यांचा व्यवसाय करणारा
६. फळातील द्रव
७. मोटार, बस इ.
८. जास्तीत जास्त
९. पंचामृतातील फळ
११. कणीदार
१४. भित्रा
१५. हातोहात, चपळाईने
१७. बोलगाणे
२०. आई
२२. पादत्राण
२४. हिरवा ताजा मसाला
२६. फळांचे पेय
२८. धागा तयार करण्याची प्रक्रिया
२९. उदर
३१. प्रफुल्लित
३४. पालवीचा ऋतू
३५. औषधाची मात्रा
३७. चंद्र
३८. अजाणता
४०. तऱ्हतऱ्हेची फळे
४१. चाळणी अशी असते
४३. दिवस
४४. कप्पा, खण
४५. केशतेलातील सुगंधी वनस्पती
४६. जेमतेम
४८. कोरी
५१. बेडकांचे पर्जन्यगीत
५३. आच्छादन, आवरण
५४. विहीर
५६. पालव, साडीचा शेवटचा भाग
५७. करूणा, कीव
५८. उगीच
५९. खडा
६०. जलद व चपळाईने हालचाल करणे
६२. वृक्ष
६३. काळ्या तोंडाचे माकड
६४. मनाला लागलेली टोचणी
६५. यजमान, पती
६७. रहित
६९. कान
७१. वेल
७२. चंद्राची कड
७३. स्वर
७५. झाकणाचे पात्र

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.गोष्टीवेल्हाळ ४.जवळपास ७.उदबत्ती ९.तसा १०.सन ११.वधस्तंभ १२.नीर १४.अवनती १५.सान १६.यशवंत १८.यमराज २०.काळा २१.नाच २२.तर २३.फसगत २५.समरस २७.पायजमा २९.वडील ३१.नारद ३२.बनकर ३३.वरात ३५.वीररस ३६.हवालदार ३९.सनगर ४१.दादला ४२.मम ४४.टवकारणे ४६.वरताण ४७.मकान ४९.दाखल होणे ५१.सामना ५२.कडोसार ५३.कमतरता ५६.सावळा ५७.समरभूमी ५८.याक ५९.पहा ६०.कवडसा ६२.जागर ६५.सुतार ६७.हेडमास्तर ६९.अंगराज ७०.धावणे ७१.रडार ७२.मधुकर

उभे उत्तर : १.गोपनीय २.वेत ३.ल्हासा ४.जनननमास ५.पावसाळा ६.सधन ७.उभयचर ८.बळवंत १०.सव १३.रमणीय १७.तरतूद १९.जनमानस २०.कातडी २१.नामदेव २३.फकीर २४.गवगवा २६.सनातन २७.पालवी फुटणे २८.जबर ३०.लगदा ३४.रास ३६.हलाहल ३७.लपवणे ३८.रमताराम ४०.रतन ४१.दाणेदार ४३.मण ४५.कानाडोळा करणे ४७.ममता ४८.काना ५०.होकार ५१.सारक ५२.कव ५३.कमीजास्त ५४.तयार ५५.महाराज ५६.साधासुधा ५७.ससा ६१.डबर ६३.गरम ६४.घागर ६६.ताव ६७.हेर ६८.मात्र ६९.अंक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



# मातीच्या लेकी शेतकरी गटाचा स्नेहमेळावा उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)

"माझा गट, माझं कुटुंब" या भावनेतून मातीच्या लेकी शेतकरी गटाचा स्नेहमेळावा व फार्म फिस्टा कार्यक्रम ऋणिता चव्हाण यांच्या उडीद पिकाच्या प्लॉटवर उत्साहात संपन्न झाला. यावेळी महिलांनी सेंद्रिय उडीद पिकाची पाहणी, कामगंध व चिकट सापळे, पक्षी थांबे आदी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी तालुका कृषी अधिकारी सचिन हाके, सहाय्यक कृषी अधिकारी विजय गोफणे, विनोद गोफणे, धुमाळ, पाणी फाउंडेशनचे मयूर साळुंखे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गटातील ११ महिला सदस्यांनी सहभाग घेतला. विविध खेळ, पतंग उडवणे, गप्पा, फोटोसेशन व सामुदायिक भोजनातून कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



पुण्यात होणाऱ्या शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमास लोकसभेचे विरोधी पक्षनेते मा. राहुलजी गांधी विद्यार्थीनींशी संवाद साधणार आहेत. यासाठी कार्यक्रमाच्या तयारीची पाहणी करून पत्रकार परिषदेवेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सतेश पाटील, रमेश बागवे, माजी आमदार मोहन जोशी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी, पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, मनोज त्यागी, अ. भा. काँ. क. च्या रेहाना चिस्ती, प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### काँग्रेस कमिटीच्या वतीने भारतरत्न स्व. राजीव गांधी यांची जयंती साजरी

पुणे : दैनिक संध्या

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त आज काँग्रेस भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, महाराष्ट्राचे सहप्रभारी बी. एम. संदिप, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी, अ. भा. काँ. क. च्या रेहाना चिस्ती, प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे, नगरसेवक अरविंद शिंदे, शहर उपाध्यक्ष कैलास गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहून राष्ट्रसेवा करावी : ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे

पुणे : दैनिक संध्या



संत यादव बाबा माध्यमिक विद्यालय शिंदवणे येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक राष्ट्रीय प्रवचनकार डॉ रवींद्र भोळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकल्प संचालक बीबीके जीपीएस संचालक प्रकाश जगताप हे होते. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. तंबाखू मुक्त युवा अभियान राबवून विद्यार्थ्यांना तंबाखू खाणार नाही यासाठी शपथ देण्यातआली. याप्रसंगी डॉ.रवींद्र भोळे म्हणाले की विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त रहावे तसेच तंबाखूमुक्त युवा अभियान आपण राबवित असताना त्याची अंमलबजावणी व्हावी. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहून राष्ट्रसेवा करावी असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी माजी मुख्याध्यापक सुरेश कांचन, संस्थेच्या अध्यक्षा उषाताई जनार्दन महाडिक, उपाध्यक्ष रामदास जयवंत महाडिक, संचालिका विद्याताई यादव, संचालिका सारिका महाडिक, पुष्पाताई महाडिक, अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती सोमनाथ कुंजीर, उपाध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती महेश भिसे, प्रशासक शिंदवणे ग्रामपंचायत प्रमिला शितोळे, सदस्य ग्रामपंचायत ओंकार मांढरे, पोलीस पाटील पोपट महाडिक, ओम राजे मुकेश महाडिक, धर्मवीर संभाजी कुस्ती संकुल शरद महाडिक, संपादक संघनायक न्यूज सदाशिव कांबळे, पत्रकार अमोल महाडिक, शंकर जरड, सोमनाथ खेडकर, भाऊसाहेब महाडिक, रामदास कोतवाल, गीताराम महाडिक, बन्सीलाल महाडिक, गोरख महाडिक, भरत महाडिक, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक श्री संत यादव हायस्कूलचे मुख्याध्यापक दादासो लांडे सर ह्यांनी केले.उपशिक्षक कोपनार सर, उपशिक्षक विचारे, विकास कुंजीर, कल्याणी जाधव, रेखा जाधव, संतोष गायकवाड, प्राची जगताप, सुरज गायकवाड, शंकर शिंदे, कामठे सर, सोमनाथ बानमारे, ज्ञानदेव कुंजीर, महेश चव्हाण इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी साठी प्रयत्न केला.



### सायबर फसवणुकीतील ५० हजारांची संपूर्ण रक्कम आठ दिवसांत परत

पुणे : दैनिक संध्या

मोबाईलवर आलेल्या अद्ययावत संदेशाच्या माध्यमातून मोबाईल हॅक करून एका नागरिकाची तब्बल ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणात येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने तत्परतेने कार्यवाही करत बँक व संबंधित व्यापाऱ्यांशी प्रभावी पत्रव्यवहार आणि दूरध्वनीद्वारे संपर्क साधत सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळाले असून, फसवणूक झालेली संपूर्ण ५० हजार रुपयांची रक्कम अवघ्या आठ दिवसांत नागरिकाला परत मिळवून देण्यात आली आहे. येरवडा, पुणे येथील रहिवासी ताजुद्दीन बारभुईया यांना मोबाईल अद्ययावत करण्यासंदर्भातील संदेश प्राप्त झाला होता. त्यानंतर त्यांच्या मोबाईलशी संबंधित फसवणूक होऊन त्यांच्या खात्यातून ५० हजार रुपये परस्पर काढण्यात आले. याबाबत त्यांनी येरवडा पोलीस ठाण्यातील सायबर पथकाकडे तक्रार अर्ज दाखल केला. या प्रकरणाची नोंद सायबर अर्ज क्रमांक 31908260172461/2026 अशी करण्यात आली. तक्रार प्राप्त होताच येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाने प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. फसवणुकीची रक्कम ज्या माध्यमातून हस्तांतरित झाली, त्या संबंधित बँक व व्यापाऱ्यांशी तातडीने संपर्क साधण्यात आला. तसेच आवश्यक कागदपत्रे, पुरावे आणि पाठपुरावा करून फसवणुकीची रक्कम परत मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. पोलिसांच्या या तत्पर आणि सातत्यपूर्ण कार्यवाहीमुळे ५० हजार रुपयांची संपूर्ण रक्कम आठ दिवसांच्या कालावधीत परत मिळविण्यात यश आले. त्यामुळे सायबर फसवणुकीला बळी पडलेल्या नागरिकाला मोठा दिलासा मिळाला आहे.

## सायबर जनजागृतीला बालगंधर्व रंगमंदिरात उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या क्विक हील फाउंडेशन क्लब तर्फे क्विक हील फाउंडेशन यांच्या सहकार्याने डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढणारे सायबर धोके लक्षात घेता नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या क्विक हील फाउंडेशन क्लब तर्फे क्विक हील फाउंडेशन यांच्या सहकार्याने बालगंधर्व रंगमंदिर, जे. एम. रोड, पुणे येथे आऊट डोअर मास अवेरनेस एक्टिव्हिटी उत्साहात पार पडली. या उपक्रमांतर्गत अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या क्विक हील फाउंडेशन क्लबच्या सायबर वॉरीअर्सनी केवळ कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित नागरिकांनाच नव्हे, तर परिसरातील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत सायबर सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगितले. ऑनलाइन फसवणूक, ओटीपी, संशयास्पद लिंक, बनावट कॉल, सोशल मीडिया फसवणूक, यूपीआय संबंधित फसवणूक तसेच वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत नागरिकांना सोप्या आणि दैनंदिन जीवनातील उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. आऊट डोअर मास अवेरनेस एक्टिव्हिटीचा मुख्य उद्देश सायबर जनजागृती महाविद्यालयाच्या किंवा वर्गाच्या चौकटीबाहेर नेऊन थेट समाजापर्यंत पोहोचवणे हा होता. सायबर वॉरीअर्सनी नागरिकांशी मैत्रीपूर्ण पद्धतीने संवाद साधत त्यांच्या शंका जाणून घेतल्या आणि विविध सायबर फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत माहिती दिली. नागरिकांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत सायबर सुरक्षेबाबत विविध प्रश्न विचारले. या उपक्रमाला प्रमुख पाहुण्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची उपस्थिती लाभली. त्यांनी सायबर वॉरीअर्सच्या जनजागृतीच्या कार्याचे कौतुक करत, युवकांनी सायबर सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या विषयावर समाजामध्ये प्रत्यक्ष जाऊन जागरूकता निर्माण करणे हे कौतुकास्पद कार्य असल्याचे सांगितले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे सायबर वॉरीअर्सचा उत्साह आणखी वाढला.

हा उपक्रम अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. विलास वाणी तसेच शिक्षक समन्वयक प्रा. मनिषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या क्विक हील फाउंडेशन क्लब च्या सायबर वॉरीअर्सनी यशस्वीरीत्या पार पाडला. या जनजागृती उपक्रमासाठी क्विक हील फाउंडेशनचे अनुपमा काटकर, दीपू सिंग, अजय शिर्के आणि गायत्री मॅडम तसेच त्यांच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले. समाजातील नागरिकांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश थेट पोहोचवण्याच्या या प्रयत्नातून "सायबर सुरक्षा ही केवळ तंत्रज्ञानाची जबाबदारी नसून प्रत्येक डिजिटल नागरिकाची जबाबदारी आहे" हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

## सीमेवरील जवानांना पुण्यातून राखीचा स्नेहबंध

■ पुणे (दै. संध्या)

■ सैनिक मित्र परिवार आणि सहयोगी संस्थांच्या वतीने सीमेवर तैनात जवानांसाठी २१ हजार राख्या रवाना



आपल्या घरातील भावाच्या मनगटावर राखी बांधताना देशाच्या सीमेवर मातृभूमीच्या रक्षणासाठी उभ्या असलेल्या जवानांच्या त्यागाची आठवण ठेवत, रक्षाबंधनाच्या निमित्ताने देशवासीयांची कृतज्ञता व्यक्त होत आहे. जवानांना सणाच्या दिवशी आपल्या कुटुंबाची उणीव भासू नये आणि देश त्यांच्या पाठीशी असल्याची जाणीव व्हावी, या उद्देशाने पुण्यात 'सैनिक मित्र परिवार' आणि सहयोगी संस्थांच्या वतीने जवानांसाठी लाखो राख्या पाठविण्यात येतात त्यापैकी २१ हजार राख्यांचे पूजन करून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सैनिक मित्र परिवार आणि सहयोगी संस्थांतर्फे सैनिकांना पाठवण्यात येणाऱ्या राख्यांचे पूजन बाजीराव रस्त्यावरील झांजले विठ्ठल मंदिर येथे करण्यात आले होते. खासदार मेधा कुलकर्णी, अतिरीक्त पोलिस आयुक्त अनुजा देशमाने, सैनिक मित्र परिवारचे आनंद सराफ, अशोक मेहंदळे, नगरसेविका स्वप्नाली पंडित, कालिंदी पुंडे, प्रा. डॉ. वर्षा तोडमल, राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी शहराध्यक्षा स्वाती पोकळे, मनसे महिला शहराध्यक्षा वनिता वागसकर, लायन्स क्लबच्या नीता अगरवाल, नंदा पंडीत, रती पाटील, गायिका सुवर्णा कुलकर्णी, मीना भालिया, प्रतिभा जक्का, वृषाली शेंडे, शीतल अमराळे आदी उपस्थित होते. कल्याणी सराफ, सुनीता शिंदे, रचना झांजले यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या. सैनिकांसाठी शाळेतील आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी रेखाटलेली चित्रे आणि शुभेच्छा संदेश देखील पाठवण्यात आले.

## महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय वाघमारे यांचे निधन

■ पुणे (दै. संध्या)

महावितरण पुणे परिमंडलाच्या पायाभूत विकास आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. संजय वाघमारे (वय ५२) यांचे गुरुवारी, दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी रुबी हॉल क्लिनिक (पुणे) येथे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. मे २०२६ मध्ये पुणे परिमंडलाच्या पायाभूत विकास आराखडा विभागात अधीक्षक अभियंता म्हणून बदलीवर रुजू झालेले श्री. वाघमारे यापूर्वी महावितरणच्या सांघिक कार्यालयात अधीक्षक अभियंता (अपारंपरिक ऊर्जा) म्हणून कार्यरत होते. महावितरणमधील प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम करत वीज क्षेत्रातील विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले. वीज मंडळात १९९९ साली सहायक अभियंता पदावर निवड झाल्यानंतर त्यांनी २००६ साली सरळ सेवेतून उपकार्यकारी अभियंता, २०१० साली अतिरिक्त कार्यकारी अभियंता, २०१६ साली कार्यकारी अभियंता आणि २०२४ साली सरळ सेवेतून अधीक्षक अभियंता म्हणून जबाबदारी स्वीकारली. या प्रदीर्घ



सेवाकाळात कल्याण, पुणे, केडगाव, बारामती तसेच मुंबई येथे त्यांनी विविध पदांवर काम केले. महावितरणच्या अभियंता व अधिकारी वर्गासह वीज क्षेत्रात त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. प्रदीर्घ सेवेतून त्यांनी केलेले कार्य आणि वीज क्षेत्रासाठी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. श्री. वाघमारे यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता महादेव मंदिर, रहाटणी (पिंपरी-चिंचवड) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## दिशा परिवारतर्फे शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान सोहळा

**दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या हस्ते पुण्यात रविवारी होणार वितरण**

■ पुणे (दै. संध्या)

दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गरजू व गुणवत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. यंदा कार्यक्रमाचे २० वे वर्ष असून, येत्या रविवारी (ता. २३ ऑगस्ट) सकाळी १० वाजता नवी पेठेतील एसएम जोशी सभागृहात हा सोहळा पार पडणार आहे, अशी माहिती संस्थेचे शिष्यवृत्ती प्रदान समारंभ समितीचे अध्यक्ष सुजीत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी निखिल पडवळ आणि चिन्मय कुलकर्णी उपस्थित होते. सुजीत शिंदे म्हणाले, "या कार्यक्रमाला राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त दत्तात्रय वारे गुरुजी, एबीपी माझा वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक राजीव खांडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. भाऊसाहेब जाधव अध्यक्षस्थानी असणार आहेत. उद्योजक



गणेश जाधव, दिशा परिवाराचे संस्थापक राजाभाऊ चव्हाण आणि दैनिक प्रभातचे सरव्यवस्थापक रवीकुमार इंडी उपस्थित राहणार आहेत." पुण्यासारख्या ठिकाणी ग्रामीण भागातून विद्यार्थी उच्चशिक्षणासाठी येतात. मात्र उच्चशिक्षणाचा खर्च करु शकत नसल्याने त्यांचे शिक्षण अपुरे राहू नये, या उद्देशाने राजाभाऊ चव्हाण यांनी २० वर्षांपूर्वी दिशा परिवाराची स्थापना केली. आतापर्यंत संस्थेच्या माध्यमातून सहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली असून, यंदा २५० विद्यार्थ्यांना जवळपास ८ लाख रुपयांची शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, असेही शिंदे यांनी नमूद केले.

'आम्ही फक्त दोन हातांमधले अंतर कमी करतो' या उक्तीप्रमाणे दिशा परिवार गरजू विद्यार्थी आणि दाते यांना जोडणारा दुवा म्हणून काम करतो. गेल्या २० वर्षांपासून संस्थेच्या माध्यमातून शिष्यवृत्ती मिळालेले आणि आता आपल्या क्षेत्रात स्थिरावलेले विद्यार्थीच आता दाते झाले असून, मदतीची ही साखळी अशीच सुरू राहील अशी आशा आहे. दिशा परिवार केवळ अर्थिक मदत देऊन थांबत नाही, तर विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला करिअर मार्गदर्शन, मॉक इंटरव्ह्यू, व्यक्तिमत्त्व विकास, तज्ज्ञ मार्गदर्शन यांसारखे विविध कार्यक्रमही राबविण्यात येतात, असे पडवळ यांनी यावेळी सांगितले.

## दिव्यांग ३६१ व्यक्तींना आधार

■ पुणे (दै. संध्या)




कृत्रिम अवयवांच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, उदयपूर येथील नारायण सेवा संस्थान २३ ऑगस्ट रोजी पुण्यात 3D-प्रिंटेड नारायण मॉड्युलर कृत्रिम अवयव रोपण शिबिर आयोजित करेल. टाटा टेले बिझनेस सर्व्हिसेस आणि न्यूमन अँड एस्सार ग्रुप यांच्या संयुक्त पाठिंब्याने आयोजित केले जाणारे हे शिबिर, दिव्यांग असलेल्या ३६१ व्यक्तींना मोफत आधुनिक कृत्रिम अवयव आणि सहाय्यक साधने प्रदान करेल. शिबिरासोबतच देणगीदार सत्कार समारंभही आयोजित केला जाईल. हे शिबिर सकाळी ८:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत तिरुपती मंगल कार्यालय, टिंगरे नगर, रोड नंबर २, विश्रांतवाडी एअरपोर्ट रोड, पुणे येथे होईल. उद्घाटन सकाळी ११:०० वाजता होईल. या शिबिरात केवळ पूर्व-निवडलेले लाभार्थीच सहभागी होतील.

हे शिबिर सकाळी ८:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत तिरुपती मंगल कार्यालय, टिंगरे नगर, रोड नंबर २, विश्रांतवाडी एअरपोर्ट रोड, पुणे येथे होईल. उद्घाटन सकाळी ११:०० वाजता होईल. या शिबिरात केवळ पूर्व-निवडलेले लाभार्थीच सहभागी होतील. संस्थानच्या माहितीनुसार, दिव्यांग असलेल्या २६८ व्यक्तींना २७६ नारायण मॉड्युलर कृत्रिम अवयव बसवले जातील, तर दिव्यांग असलेल्या ६० व्यक्तींना ८५ कॅलिपर्स बसवले जातील. आवश्यक ती सहाय्यक साधने देखील प्रदान केली जातील. या लाभार्थ्यांची निवड ५ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत नारायण अवयव मापन (मेझरमेंट) शिबिरादरम्यान करण्यात आली होती.

या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे जपानी आणि जर्मन तंत्रज्ञानावर आधारित 3D-प्रिंटेड नारायण मॉड्युलर कृत्रिम अवयव हे असेल. पारंपारिक कृत्रिम अवयवांच्या तुलनेत, मॉड्युलर तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा पैलू असा आहे की, याचे विविध भाग प्रत्येक व्यक्तीच्या गरजेनुसार बसवले आणि बदलले जाऊ शकतात, ज्यामुळे ते वापरकर्त्यासाठी अधिक सोयीस्कर ठरतात. 3D-आधारित उत्पादन तंत्रज्ञान कृत्रिम अवयवाच्या रचनेत आणि त्याच्या फिटिंगमध्ये आवश्यक ती अचूकता मिळवण्यास मदत करते.




## अँथे २०२६ सुरू; १ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग, १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्तीची संधी

■ पुणे (दै. संध्या)

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने (एईएसएल) देशातील विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक क्षमता ओळखून स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने 'आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम' अर्थात अँथे २०२६ सुरू केली आहे. गेल्या १६ वर्षांत एक कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली असून, देशातील सर्वाधिक काळ सुरू असलेल्या आणि मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या प्रतिभा शोध परीक्षांमध्ये अँथेचा समावेश होतो. अँथे ही केवळ गुण मिळविण्याची परीक्षा नसून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तयारीचे सर्वांगीण मूल्यमापन करणारी निदानात्मक परीक्षा म्हणून विकसित करण्यात आली आहे. प्रत्येक प्रश्न विशिष्ट संकल्पना आणि क्षमतांचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने तयार केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना विषयज्ञानाबरोबरच त्यांच्या विश्लेषणात्मक क्षमतेची, स्पर्धात्मक तयारीची आणि परीक्षा देण्याच्या पद्धतीचीही जाणीव होते.

स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीत विद्यार्थ्याने किती गुण मिळविले याबरोबरच तो सध्या कुठे आहे, त्याची बलस्थाने कोणती आहेत आणि कोणत्या बाबींमध्ये सुधारणा आवश्यक आहे, हे समजणे महत्त्वाचे असते. याच उद्देशाने अँथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील बेंचमार्किंग आणि वैयक्तिक शैक्षणिक माहिती उपलब्ध करून दिली जाते. अँथेतील प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला तपशीलवार 'अँथे इंटेलिजन्स रिपोर्ट' देण्यात येतो.

## थोडक्यात पण महत्वाचे

### एक महिन्यात मराठी शिकण्याची संधी, अन्यथा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित

**मुंबई / दै. संध्या**

महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांना प्रवाशांशी सुसंवाद साधता यावा, यासाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या चालकांना व्यावहारिक मराठीचे ज्ञान नसल्याचे तपासणीत आढळेल, त्यांना नोटीस बजावून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात येत आहे. या मुदतीत मराठी भाषेचे ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुंबई महानगर क्षेत्रात झालेल्या तपासणीत ३ हजार १९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले असून, या सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. राज्यातील उर्वरित आकडेवारीनुसार आतापर्यंत ४ हजार २२२ चालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. “महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी-सुरक्षेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल,” असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. ही तपासणी मोहीम ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. तपासणीदरम्यान चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान तपासले जाईल. मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांना सुधारणा करण्याची संधी देण्यात येणार असली, तरी त्यानंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात विहित मुदतीनंतर बॅज निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे.

### शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या २ हजार ४२१ पदांसाठी मेगाभरती

**मुंबई / दै. संध्या**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ‘पवित्र’ पोर्टलद्वारे वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशी एकूण २ हजार ४२१ रिक्त पदे भरण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेमुळे राज्यातील हजारो पात्रताधारक उमेदवारांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. आदिवासी विकास विभागाच्या नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर येथील शासकीय आश्रमशाळांतील रिक्त जागांसाठी शिक्षक भरती प्रक्रिया सुरु आहे. नाशिक विभागात सर्वाधिक ८२६ पदे असून, त्याखालोखाल ठाणे ६१३ पदे, नागपूर ५१४ पदे तर अमरावती ४६८ पदे भरली जाणार आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम), माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशा विविध पदांचा समावेश आहे. शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीमध्ये पेसा क्षेत्रातील ८८५ तर नॉन-पेसा क्षेत्रातील १ हजार ५३६ पदांचा समावेश आहे. प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) नॉन-पेसा क्षेत्रामध्ये ८६२ जागा तर पेसा क्षेत्रामध्ये ४३६ जागा उपलब्ध आहेत. इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांसाठी पेसा व नॉन-पेसा क्षेत्रामध्ये अनुक्रमे ६७ आणि १६१ जागांवर भरती होईल. माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) नॉन-पेसा क्षेत्रामध्ये ३५२ तर पेसा क्षेत्रात १३८ जागा उपलब्ध आहेत. माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) पेसा क्षेत्रात ५ आणि नॉन-पेसा क्षेत्रात २२ जागांवर भरती प्रक्रिया पार पडेल. उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पेसा क्षेत्रामध्ये २५१ आणि नॉन-पेसा क्षेत्रामध्ये १०६ अशा एकूण ३५७ जागा उपलब्ध आहेत. यात मराठी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या उच्च माध्यमिक स्तरावरील विविध शाखांच्या विषयांचा समावेश आहे. आश्रमशाळा शिक्षक भरती प्रक्रियेत स्थानिक व आदिवासी क्षेत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी पेसा आणि नॉन-पेसा क्षेत्रांचे स्पष्ट विभाजन करण्यात आले आहे. यानुसार संपूर्ण भरतीमध्ये पेसा क्षेत्रासाठी ८८५ तर नॉन-पेसा क्षेत्रासाठी १ हजार ५३६ जागा राखीव आहेत. ही भरती प्रक्रिया ‘पवित्र’ पोर्टलद्वारे अत्यंत पारदर्शकपणे, गुणवत्तेच्या आधारावर आणि नियमानुसारच होत आहे. त्यामुळे उमेदवारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. असे आवाहन आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

### अफेअरच्या आड रक्ताचा खेळ! प्रियकरासाठी काढला जातोय पतीचा काटा

**नागपूर / दै. संध्या**

भारतीय संस्कृतीत पती- पत्नीचे नाते पवित्र, विश्वासाचे आणि कौटुंबिक संस्कारांचा पाया मानले जाते. परंतु, या पवित्र बंधनाला सध्या अनैतिक संबंधांची गडद काजळी धरताना दिसत आहे. अनैतिक संबंधांत अडसर ठरणाऱ्या पतीचा थेट 'काटा' काढण्यापर्यंत पत्नी आणि तिचे प्रियकर मजल मारत आहेत. ज्या हातांनी अग्नीला साक्षी मानून आयुष्यभर साथ देण्याची शपथ घेतली, तेच हात आज पतीचा गळा आवळताना किंवा त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करताना अजिबात कापत नाहीत. कौटुंबिक संस्कार, निष्ठा आणि आदर्शांना तिलांजली देणाऱ्या अशा घटनांनी संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. राज्यात गेल्या काही काळात घडलेल्या अशाच भयानक घटनांनी हादरवून सोडले आहे. नुकतीच वर्धा जिल्ह्यातील शेकापूर येथे १९ ऑगस्ट २०२६ रोजी सपना केकाळे हिने पतीच्याच चुलत भावाशी जुळलेल्या अनैतिक संबंधांतून पती संतोष केकाळे यांची गळा आवळून हत्या केली आणि मृतदेह विहिरीत फेकून दिला. त्यापूर्वी ९ ऑगस्ट २०२६ रोजी नागपूरच्या एमआयडीसी परिसरात २२ वर्षांच्या पूजाने अनैतिक संबंधात अडथळा ठरणारा पती सुधीरला आधी भक्कम दारू पाजली आणि त्यानंतर त्याला ओढणीने गळा आवळून मारले. तर १ एप्रिल २०२५ रोजी पुण्याजवळील लोणी काळभोर येथे अनैतिक संबंध उघडकीस येण्याच्या भीतीतून शोभा काळभोर हिने प्रियकर गोरख काळभोर याच्या मदतीने पती रवींद्र काळभोर झोपेत असताना त्याची डोक्यात फावडा मारून हत्या केली.

# २०५० पर्यंत जगातील शहरांचे चित्र बदलणार

■ नवी दिल्ली(दै. संध्या)

जगातील वाढत्या लोकसंख्येच्या वेगामुळे २०५० पर्यंत जागतिक शहरांचे स्वरूप आणि शहरीकरणाचा ढाचा पूर्णपणे बदलणार आहे. 'अवर वर्ल्ड इन डेटा' आणि युरोपीय आयोगाच्या ताज्या अहवालानुसार, आगामी काळात जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या महानगरांमध्ये पाश्चात्य देशांऐवजी आशिया आणि आफ्रिका खंडांचा दबदबा असेल.

बांगलादेशची राजधानी ढाका (५.२१ कोटी) आणि इंडोनेशियाची राजधानी जकार्ता (५.१८ कोटी) या दोन्ही शहरांची लोकसंख्या ५ कोटींच्या पुढे जाऊन ती जगातील सर्वात मोठी शहरे बनतील. तर भारताची राजधानी नवी दिल्ली जगातील चौथे सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर ठरणार आहे.

२०५० मधील जगातील प्रमुख मेगासिटीज ढाका (बांगलादेश): ५.२१ कोटी लोकसंख्येसह जगात पहिल्या क्रमांकावर असेल. जकार्ता (इंडोनेशिया): ५.१८ कोटी लोकसंख्येसह दुसऱ्या क्रमांकावर राहील. शांघाय (चीन): ३.४९ कोटी लोकसंख्येसह तिसऱ्या स्थानावर असेल. नवी दिल्ली (भारत): ३.३९ कोटी लोकसंख्येसह जगात चौथ्या क्रमांकाचे महानगर बनेल. कोलकाता आणि मुंबई: भारतातील कोलकाता (२.३८ कोटी) आणि मुंबई (२.३१ कोटी) ही शहरेही जागतिक टॉप-१५ मेगासिटीजमध्ये स्थान टिकवून ठेवतील. इजिप्तची राजधानी कैरो (३.२४ कोटी) आणि अंगोलाची राजधानी लुआंडा (२.०३ कोटी) या शहरांमध्येही शहरीकरणाचा वेग अभूतपूर्व असेल. अहवालानुसार, २०५० मधील जगातील टॉप-१५ सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या शहरांपैकी १३ शहरे एकट्या आशिया खंडातील असतील. यामध्ये चीनमधील शांघाय आणि ग्वांगझू, पाकिस्तानमधील कराची आणि लाहोर, तसेच फिलिपाइन्सची राजधानी मनिला या वेगाने विस्तारणाऱ्या शहरांचा समावेश आहे. २ ते ५ कोटी लोकसंख्येच्या शहरांसाठी परवडणारी घरे, रस्ते, सांडपाणी व्यवस्था आणि अखंड वीजपुरवठा पुरवणे हे सरकारसमोरील मोठे आव्हान असेल.



## नुकसान भरपाईचा प्रश्न टीआयएसएसच्या अहवालानंतर दोन महिन्यात मार्गी लागणार

■ मुंबई (दै. संध्या)

वर्सोवा-वांद्रेसागरीसेतूप्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांच्या प्रलंबित नुकसान भरपाईबाबत निकष ठरवण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) कडून सविस्तर अभ्यास केला जात आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोन महिन्यात मच्छिमारांना भरीव नुकसान भरपाई देण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठक झाली. यावेळी मत्स्यविकास मंत्री नितेश राणे, विभागाचे सचिव एम रामास्वामी, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, माजी आमदार किरण पावसकर, मच्छिमार संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

कोस्टल रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या मच्छिमारांपैकी अद्याप काही जणांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. याबाबत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. राज्य शासन मच्छिमारांच्या पाठिशी असून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मच्छिमारांच्या नुकसान भरपाईचे निकष ठरवण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसकडून करण्यात येत असलेला अभ्यास तसेच जुहू-वर्सोवा परिसरात जेटी, नेट फिक्सिंग, आणि ड्रायिंग यार्ड यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली.

## मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

■ मुंबई (दै. संध्या)

माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन म्हणून २१ ऑगस्ट रोजी राज्यभर ‘जलसंधारण दिन’ साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर’ आणि ‘मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धे’ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या प्रतिसादाची दखल घेत मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेसाठी रील्स अपलोड करण्याची मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मृद व जलसंवर्धनाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच या विषयाशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रील्स स्पर्धेचे आयोजन




करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी यापूर्वी १९ ऑगस्ट २०२६ पर्यंत रील्स अपलोड करण्याची मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र, क्षेत्रीय स्तरावर या स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि रील्स तयार करून अपलोड करण्यासाठी उपलब्ध झालेला कमी कालावधी लक्षात घेऊन स्पर्धेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत रील्स अपलोड करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. मृद व जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, त्यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे. ‘माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा’ या संदेशातून नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे आणि आपल्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून मृद व जलसंधारणाचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.

दरम्यान, २१ ऑगस्ट रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या ‘महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर’मध्येही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाच्या लोकचळवळीला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सहकाऱ्याचा हात मोडला'; सीजेपीच्या आशुतोष रांकाने सांगितला घटनाक्रम

■ रामपुरा (दै. संध्या)

'रामपुरा-कंवरपुरामध्ये आम्ही शाळेची पाहणी करण्यासाठी गेलो होतो. मागील अनेक वर्षांपासून येतो. पण, आम्ही तिथे पोहोचण्यापूर्वीच भाजपाचे गुंड हजर होते. त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांवर आधी हल्ला केला. माझे शर्ट फाडला, सहकाऱ्याचा हात मोडला, आमचे मोबाईल फोडले. मी शिक्षणमंत्र्यांना सांगतोय, ४८ तास आहेत कारवाई करा', असा इशारा आशुतोष रांका यांनी दिला.

राजस्थानातील रामपूर-कंवरपूरमध्ये



सीजेपीचे कार्यकर्ते शाळेची पाहणी करण्यासाठी गेले असता, त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यांना पळवून पळवून मारण्यात आले. या घटनेची व्हिडीओही समोर आले आहेत.

आशुतोष रांका म्हणाले की, "आम्ही शाळेची पाहणी करण्यासाठी गेलो होतो. मागील अनेक वर्षांपासून पाहणी करतो. तिथली शाळा ही म्हशीच्या गोठ्यात भरते. आम्ही मागच्या वर्षीही शाळेची पाहणी केली होती. अजूनही परिस्थिती तशीच आहे." "आमचे लोक शाळेची पाहणी करण्यासाठी पोहोचण्याआधीच तिथे भाजपाचे गुंड पोहोचले होते. आमच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करण्यात आला. तिथे प्रसारमाध्यमांचे लोकही होते.

## गुगलवरून डिझाइन करत प्रिंटरवर छापल्या नोटा

■ विसनगर (दै. संध्या)

बनावट ५०० रुपयांच्या नोटांचा पर्दाफाश झाला आहे. मेहसाणा जिल्ह्यातील विजापूरमधून हे बनावट नोटांचे प्रकरण समोर आले आहे. विसनगर रोडवरील एचडीएफसी बँकेच्या एका शाखेच्या कॅश डिपॉझिट मशीनमध्ये २६ बनावट ५०० रुपयांच्या नोटा सापडल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. पोलिसांनी या प्रकरणी चार आरोपींना अटक केली आहे. मुख्य आरोपीने गुगलवर ५०० रुपयांच्या नोटेचे डिझाइन शोधून ते लॅपटॉपवर डाउनलोड केले आणि त्यानंतर कलर प्रिंटरचा वापर करून अंदाजे १.२५ लाख रुपयांच्या बनावट नोटा छापल्या. हे प्रकरण १४ ऑगस्ट २०२६ रोजी उघडकीस आले, जेव्हा एचडीएफसी बँकेच्या कॅश डिपॉझिट मशीनमध्ये ५०० रुपयांच्या २६ बनावट नोटा सापडल्या. बँक व्यवस्थापनाने पोलिसांना माहिती दिली आणि तक्रार दाखल केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पटेल ध्रुव नावाचा एक तरुण आपल्या पत्नीच्या बँक खात्यात ५०,००० रुपये जमा करण्यासाठी मशीनजवळ गेला होता. त्याने मशीनमध्ये ५०० रुपयांच्या १०० नोटा टाकल्या, परंतु त्याच्या मोबाईल फोनवर केवळ ३७,००० रुपये जमा झाल्याचा मेसेज आला. जेव्हा ध्रुवच्या लक्षात तफावत आली, तेव्हा त्याने बँकेच्या कर्मचाऱ्यांना माहिती दिली. नंतर त्याच संध्याकाळी, बँकेच्या कर्मचाऱ्यांनी कॅश डिपॉझिट मशीन उघडून त्यात जमा झालेल्या नोटा तपासल्या.



## ‘टेक्नॉलॉजी अवेअरनेस रोडशो २०२६’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

अत्याधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञान आणि संशोधनातील नव्या संधींची माहिती वैज्ञानिक, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने निरव बायोसोल्युशन्स प्रा. लि. यांच्या वतीने १९ व २० ऑगस्ट २०२६ रोजी NCCS आणि IISER, पुणे येथे ‘टेक्नॉलॉजी अवेअरनेस रोडशो २०२६’चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात Abbexa, OHAUS, Thermo Fisher Scientific, OTT Scientific यांसारख्या जागतिक ब्रँड्सच्या अत्याधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञानासोबत Make in India अंतर्गत विकसित होणाऱ्या deNOVO Biolabs च्या तंत्रज्ञानाचेही सादरीकरण करण्यात आले.


### जाहिर लिलाव

रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ या संस्थेचे दुरुस्त न होणाऱ्या, निरुपयोगी निर्लेखित शासकीय वस्तू, उपकरणे फर्निचर हत्यारे अवजारे व इतर साहित्य यांचा जाहिर लिलाव दि १२.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या आवारात आयोजित करण्यात येणार आहे. लिलावातील वस्तु पहाण्यासाठी दि. १०.०९.२०२६ ते ११.०९.२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते २.०० वाजेपर्यंत पहाण्यास मिळतील.

अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ८३०८५१९३७२

स्वाक्षरी/-
सहआयुक्त पशुसवंर्धन रोग
अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७

विमाका/पुणे/जाहिरात/१३४/२०२६-२७

### भिवडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भिवडी

ता. पुरंदर जि. पुणे

**सभेची नोटीस**

प्राधिकरणाकडील आदेश जा. क्र. २०२६/१८६० दिनांक ०३/०८/२०२६ चे आदेशानुसार भिवडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भिवडी ता. पुंरदर जि. पुणे या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यात येते की आपल्या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यात येते की आपल्या सहकारी संस्थेच्या नोंदणीकृत उपविधितील तरतुदीनुसार संचालक पदाच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षेतखाले दि. ३१.०८. २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता सहाय्यक निबंधक सहकरी संस्था पुरंदर यांचे कार्यालय या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात येत आहे सर्च संचालकांना संचालक मंडळाच्या सवेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे सबेस संचालकामधून निवडावयाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी खालील प्रमाणे निवडणुक कार्यकमानुसार करण्यात येणार आहे

**निवडणुक कार्यकम**

| अ. क्र | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देश पत्र वाटप व स्विकृती | दुपारी ४.०० ते ४.१५ |
| २ | नामनिर्देन छाननी | दुपारी ४.१५ ते ४.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी ४.३० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी ४.३० ते ४.४५ |
| ५ | अंतिम उमेदवारांची यादी जाहिर करणे | दुपारी ४.४५ |
| ६ | आवश्यकता असल्यास मतदान प्रक्रिया | दुपारी ४.४५ पासुन मतदान संपेपर्यंत |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | मतदानानंतर लगेच |
| ८ | निवडणुक आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घाषित करणे | मत मोजणी पुर्ण झाल्यानंतर लगेच |

टिप : निवडणुक कार्यकमांतील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकार यांचे रहातील
मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने
ठिकाण : भिवडी
दिनांक : १८.०८.२०२६

सचिव
भिवडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या भिवडी, ता पुरंदर, जि पुणे

### जेजुरी नगरपरिषद, जेजुरी, जि. पुणे

ई - निविदा सूचना क्रमांक Ele Dep./०१/२०२६

जेजुरी नगरपरिषद कार्यालय,
जा.क्र. जेनपा/कावि१९७४/२०२६
दिनांक :- २१/०८/२०२६

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने विद्युत व अग्निशमन विभागाकडील **दैनंदीन कामाच्या सेवा पुरविणे (वार्षिक ठेका)** या कामाची पात्र निविदाधारकांकडून दोन लिफाफा पद्धतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांच्या निविदेचा विस्तृत नमुना व कामाचा तपशिल तसेच सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक- २२/०८/२०२६ रोजी स. ११.०० वाजलेपासून ते दिनांक ३१/०८/२०२६ रोजी दु.०४.०० पर्यंत पहावयास उपलब्ध आहे.

सही/-
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

### महावितरण — ई–निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

राजगुरुनगर विभागांतर्गत विद्युत रोहित्राच्या वितरण पेट्यांची (Dist. Boxes) ’पूर्ण टर्नकी’ (Full Turnkey) तत्त्वावर दुरुस्ती करणे कामी ठेका पद्धतीने नामांकित व नोंदणीकत अनुभवी ठेकेदार यांचेकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदा क्र. **EE/RGR/T-19/26-27** (निविदा रक्कम रुपये ४०.०० लाख (चाळीस लाख रु) निविदा विक्री कालावधी २२.०८.२०२६ ते २७.०८.२०२६ पर्यंत, निविदा भरण्याची अंतिम तारिख २८.०८.२०२६ दुपारी १२.०० वा. पर्यंत, तांत्रिक निविदा उघडणेची तारीख २८.०८.२०२६ रोजी १२.३० वा.. काही अपरिहार्य कारणास्तव नियोजित तारखेस निविदा न उघडल्यास दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील . इसारा शुल्क ऑनलाईन किंवा डी.डी. च्या स्वरुपात निविदा भरणा मुदतीपूर्वी विभागीय कार्यालयात भरणे आवश्यक आहे.

अधिक माहिती साठी कृपया कंपनीचे संकेतस्थळ :–
https://etender.mahadiscom.in/eatApp/

(पीआरओ/पुणे झोन: क्र.११७/२०२६–२७.)

कार्यकारी अभियंता,
महावितरण, राजगुरुनगर विभाग.

## थोडक्यात पण महत्वाचे



## विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन

**पिंपरी, पुणे : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या सर्व शाखांमध्ये नावीन्य, संशोधनातील उत्कृष्टता, शैक्षणिक गतिशीलता, आंतर विद्याशाखीय शिक्षण आणि जागतिक स्तरावर चालना देणारे प्रभावी सहयोग निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात या अंतर्गत परदेशातील अनेक नामांकित विद्यापीठ आणि आस्थापना बरोबर काम सुरू आहे अशी माहिती पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी दिली. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट मध्ये इंडोनेशियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ नेगेरी, जकार्ता यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच भेट दिली. यावेळी दोन्ही विद्यापीठाची शैक्षणिक, सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रातील भागीदारी अधिक दृढ करणे. जागतिक स्तरावरील सहकार्याच्या नवीन संधी शोधणे या विषयावर चर्चा करण्यात आली होती. यावेळी पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, इंडोनेशियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ नेगेरी, जकार्ता चे क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ. इरियानी इंद्री हॅपसारी, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डेविंटा अरियानी, एज्युकेशनल सायकॉलॉजिस्ट डॉ. डीस्यांती, न्यूरोसायकॉलॉजिस्ट डॉ. रत्ना ड्याह सूर्यरात्री आणि विद्यार्थी प्रतिनिधी डॅरिएल रास्या, पीसीईटीच्या सेंटर फॉर युरोपियन स्टडीज प्रमुख डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन, पीसीयू चे आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. शंकर देवसरकर, विज्ञान शाखा अधिष्ठाता आणि विभाग प्रमुख प्रा. रुची कुथियाला, सौरभ चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी पुणे आणि युनिव्हर्सिटी ऑफ नेगेरी जकार्ता यांच्या सहयोगाने 'सपोर्टिंग माइंड्स : अ प्रॅक्टिकल गाइड टू सायकॉलॉजिकल अँड मेंटल हेल्थ फर्स्ट एड फॉर युनिव्हर्सिटी स्टुडंट्स' या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या शिष्टमंडळाने पीसीसीओई मध्ये ही भेट दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक दौरा आयोजित करण्यात आला होता.



## 'ग्लास स्कायवॉक'ला गती; आमदार सुनील शेळके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**मावळ : दैनिक संध्या**

मावळ तालुक्याच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या लोणावळ्यातील बहुप्रतीक्षित 'ग्लास स्कायवॉक' प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. लोणावळ्याला भेट देणाऱ्या पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असलेल्या कुरवंडे परिसरातील टायगर आणि लायन्स पॉईंट येथे प्रस्तावित सुमारे १२५ मीटर लांबीच्या ग्लास स्कायवॉक प्रकल्पाच्या निविदेचा मसुदा अंतिम करण्यात आला असून, प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीचा मार्ग मोकळा झाला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आमदार सुनील शेळके यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. मावळ तालुक्याच्या पर्यटन विकासाला चालना देतानाच लोणावळ्याची पर्यटन ओळख अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने त्यांनी या प्रकल्पासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न केले. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून या प्रकल्पाला मंजुरी मिळवून देण्यासाठी आमदार सुनील शेळके यांनी केलेल्या प्रयत्नांना आता मूर्त स्वरूप येत असल्याने मावळच्या पर्यटन क्षेत्रासाठी ही अत्यंत महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पुढे नेण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि संबंधित यंत्रणांकडून कार्यवाही सुरू आहे. पिंपरी-चिंचवड येथील कार्यालयात झालेल्या निविदा छाननी समितीच्या बैठकीत निविदा मसुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पाला आवश्यक तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून दर विश्लेषणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून लोणावळ्याच्या निसर्गसौंदर्याचा अधिक आकर्षक पद्धतीने अनुभव पर्यटकांना घेता येणार आहे.




## पिस्तुल दाखवून लुटणारी टोळी गजाआड

**पिंपरी : दैनिक संध्या**

खराबवाडी येथे कंपनी कर्मचाऱ्याच्या मानेला पिस्तूल -लावून एक लाख आठ हजार रुपयांची रोकड लुटणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा गुन्हे शाखेच्या युनिट चारच्या पथकाने अटक केली. तब्बल १२० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी संगमनेर येथील पाच सराईत आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून कार, दुचाकी, छऱ्यांचे पिस्तूल, मोबाइल आणि रोकड असा एकूण ११ लाख ६८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सार्थक पोपट दाते (वय २१), अजित बन्सी पारधी (वय २२), सत्यवान सुनील देवकर (वय १९), हनुमंत भास्कर दाते (वय २७) आणि यश सोमनाथ पवार (वय २०, सर्व रा. जांबुत खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. १० ऑगस्ट रोजी रात्री गुडविल ट्रान्सपोर्ट कंपनीचे कर्मचारी धीरज यादव आणि पिकअप चालक रामभवन सिंह हे खराबवाडी येथील एचडीएफसी बँकेच्या एटीएममधून एक लाख रुपये काढून पिकअपमधून जात होते. पांढऱ्या रंगाच्या अर्टिगा कारने त्यांचा रस्ता अडविला. लाल रंगाच्या स्कूटीवरून आलेल्या आरोपींनीही मानेला छऱ्यांचे पिस्तूल लावून एक लाख आठ हजार रुपयांची रोकड लुटली. याप्रकरणी दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने १२० कॅमऱ्यांचे फुटेज तपासून आरोपींना गजाआड केले. त्यांच्याकडून कार, मोटारसायकल, छऱ्यांचे पिस्तूल, मोबाइल आणि २४ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली.



# अरुण बोऱ्हाडे यांचा महापालिका सभेत गौरवपूर्ण सत्कार

### कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष ते मराठी साहित्याची सेवा; अरुण बोऱ्हाडे यांच्या बहुआयामी कार्याचा महापालिकेकडून सन्मान

■ **पिंपरी (दै. संध्या)**

कामगार चळवळ, सामाजिक व राजकीय क्षेत्र आणि मराठी साहित्यविश्वात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणारे मोशी येथील ज्येष्ठ साहित्यिक, ज्येष्ठ कामगार नेते तथा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अरुण तुकाराम बोऱ्हाडे यांचा आज महापालिका सभेत मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

अरुण बोऱ्हाडे यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून कार्यरत असताना त्यांनी शहरातील विविध नागरी व सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी योगदान दिले. तसेच पुणे जिल्हा वीज वितरण समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.

पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक जडणघडणीशी निगडित असलेल्या कामगार चळवळीत अरुण बोऱ्हाडे यांचे योगदान विशेष उल्लेखनीय राहिले आहे. हिंदुस्थान अँटिबायोटिक्स कामगार संघटनेचे सरचिटणीस म्हणून त्यांनी दीर्घकाळ नेतृत्व केले. सन २००३ मधील हिंदुस्थान अँटिबायोटिक्स कंपनीतील कामगार आंदोलनासह बजाज ऑटो, फोर्स मोटर्स, सेंच्युरी एन्का तसेच चाकण औद्योगिक पट्ट्यातील कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी संघर्ष केला. कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी संघटनात्मक पातळीवर सातत्यपूर्ण प्रयत्न केले. श्रमिक एकता महासंघाच्या माध्यमातूनही त्यांनी कामगार चळवळीला संघटित बळ देण्याचे कार्य केले. कामगार व सामाजिक चळवळीबरोबरच मराठी साहित्य क्षेत्रातही बोऱ्हाडे यांनी स्वतंत्र ठसा उमटविला आहे. इंद्रायणी साहित्य परिषदेची स्थापना करून साहित्यिक, लेखक आणि नवोदित प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाची विविध संस्थांनी पुरस्कारांच्या माध्यमातून दखल घेतली असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्व आणि कार्याचा वेध घेणारा 'अरुणगंध' हा गौरवग्रंथही प्रकाशित करण्यात आला आहे.

कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी केलेला संघर्ष, लोकप्रतिनिधी म्हणून केलेली जनसेवा आणि मराठी भाषा व साहित्याच्या संवर्धनासाठी दिलेले योगदान अशा विविध क्षेत्रांतील त्यांच्या प्रदीर्घ कार्याचा गौरव म्हणून महापालिका सभेत त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित पदाधिकारी आणि नगरसदस्यांनी त्यांच्या कार्याबद्दल आदर व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सत्कार सोहळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, आर.पी. आय.नेते कुणाल वाव्हळकर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, 'क' प्रभाग समिती अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, 'ई' प्रभाग समिती अध्यक्ष अर्चना सस्ते, नगरसदस्य राहुल जाधव, निलेश नेवाळे, सारिका गायकवाड,सारिका सस्ते यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य आणि महापालिका अधिकारी उपस्थित होते. मानपत्राचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## सहा दशकांची ज्ञानयात्रा आता पिंपरी-चिंचवडमध्ये; 'सपना'चे २६ वे स्टोअर सुरू होणार

■ **पिंपरी (दै. संध्या)**

भारतातील आघाडीच्या पुस्तक विक्री केंद्रांपैकी एक असलेल्या 'सपना बुक हाऊस'चे २६वे स्टोअर पिंपरी-चिंचवडमधील एलप्रो सिटी स्क्वेअर मॉल येथे शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सुरू होणार आहे. तब्बल ६० वर्षांचा समृद्ध वारसा असलेल्या 'सपना'च्या नव्या स्टोअरमध्ये मराठी आणि इंग्रजी पुस्तकांसह स्टेशनरी, कला व हस्तकला साहित्य, भेटवस्तू, खेळणी, शालेय साहित्य, कार्यालयीन साहित्य, कॉर्पोरेट गिफ्ट्स आणि चॉकलेट्स अशा विविध वस्तू उपलब्ध होणार आहेत. याबाबतची माहिती आज गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी'सपना बुक हाऊस'चे व्यवस्थापकीय संचालक नितीन शाह, संचालक निजेश शाह, व्यवस्थापक सौरभ शिंदे आदी मान्यवर यावेळी पत्रकार परिषदेत उपस्थित होते. सन १९६७ मध्ये संस्थापक-अध्यक्ष सुरेश शाह यांनी अवघ्या ४० चौरस फूट जागेत 'सपना'ची सुरुवात केली. आज संस्थेचा विस्तार ५.५० लाख



चौरस फूट प्रदर्शन क्षेत्रापर्यंत झाला असून, देशभरात २५ स्टोअर्स कार्यरत आहेत. बंगळुरूमधील ११ स्टोअर्ससह कर्नाटक, तमिळनाडू आणि नवी दिल्ली येथेही 'सपना'ची उपस्थिती आहे. पुण्यातील हे नवीन स्टोअर 'सपना'चे २६वे केंद्र ठरणार आहे. नव्या स्टोअरमध्ये सर्वाधिक खपाची पुस्तके, सर्वसाधारण वाचनाची पुस्तके, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, व्यवस्थापन व व्यवसायविषयक पुस्तके, बालपुस्तके तसेच शालेय पुस्तकांचा मोठा संग्रह उपलब्ध असणार आहे. मराठी पुस्तकांनाही येथे विशेष स्थान देण्यात आले आहे.



## शहर अभियंतापदी नियुक्तीबद्दल मनोज सेठिया यांचा सत्कार

### शहराच्या विकासाला अधिक गती देण्याची अपेक्षा; भावी वाटचालीस दिल्या शुभेच्छा

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शहर अभियंतापदी मनोज सेठिया यांची नियुक्ती झाल्याबद्दल आज झालेल्या महापालिका सभेत त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या आजवरच्या प्रशासकीय व अभियांत्रिकी सेवेचे कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. पिंपरी-चिंचवड हे वेगाने विकसित होणारे शहर असून वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे, विकासकामांची गुणवत्ता कायम राखणे तसेच विविध प्रकल्पांना नियोजनबद्ध पद्धतीने गती देण्यामध्ये शहर अभियंता पदाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. मनोज सेठिया यांच्या अनुभवाचा उपयोग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी होईल आणि त्यांच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करणे, प्रलंबित विकासकामांना गती देणे आणि नागरिकांना अधिक उत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्या कार्यकाळात सकारात्मक योगदान मिळेल, अशी अपेक्षाही पदाधिकारी व नगरसदस्यांनी व्यक्त केली. तसेच शहर अभियंता म्हणून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी आणि भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. या सत्कार सोहळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, आर.पी. आय. गटनेते कुणाल वाव्हळकर, नगरसचिव अण्णा बोदडे यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य आणि महापालिका अधिकारी उपस्थित होते.

## वाकड येथील काळाखडक परिसरात स्कूल बसला आग

### अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठी दुर्घटना टळली


■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरातील वाकड परिसरातील काळाखडक, भूमकर चौक येथे आज सकाळी १०:३३ दरम्यान एका खासगी शाळेच्या स्कूल बसला अचानक आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित स्कूल बस विद्यार्थ्यांना शाळेत सोडून परत येत असताना काळाखडक परिसराकडे जात होती. त्यावेळी बसमधून अचानक धूर बाहेर पडत असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले असता तात्काळ बस रस्त्याच्या कडेला थांबवण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रहाटणी अग्निशमन केंद्रातील अग्निशमन पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याची कार्यवाही सुरू केली. काही वेळातच आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात आले. या आगीमध्ये संबंधित स्कूल बसचे नुकसान झाले असून, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होणे बाकी आहे. सदर घटनेच्या वेळी बसमध्ये विद्यार्थी नसल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही कार्यवाही अग्निशमन विभागाच्या लीडिंग फायरमन निखिल गोगावले, फायरमन गणेश मुसळे, फायरमन संकेत पारेकर, फायरमन दीपक कोठे, ट्रेनी सब ऑफिसर ज्ञानेश्वर हाके, ट्रेनी फायरमन प्रसाद बागेकरी आणि वाहनचालक संजय बिस्किटे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. वाहनांमधून धूर येणे, जळण्याचा वास येणे, वायरिंगमध्ये बिघाड होणे किंवा अन्य कोणतीही असामान्य बाब निदर्शनास आल्यास वाहन तात्काळ सुरक्षित



ठिकाणी थांबवावे आणि आगीची शक्यता भासल्यास त्वरित अग्निशमन विभागाच्या १०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशमन विभागाकडून यावेळी करण्यात आले.



## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'चे भव्य आयोजन

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील सांस्कृतिक चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देणे, स्थानिक कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच शहराच्या कला, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दि. १८ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत तीन दिवसीय महोत्सव संपन्न होणार असल्याची माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली. महोत्सवाच्या आयोजनाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महोत्सवाच्या स्वरूपाची व नियोजित कार्यक्रमांची माहिती दिली.

पिंपरी-चिंचवड शहराने औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रासोबतच कला, साहित्य, नाट्य, संगीत, क्रीडा आणि लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शहरातील या सांस्कृतिक ऊर्जेला एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणे, विविध पिढ्यांना सांस्कृतिक उपक्रमांशी जोडणे आणि गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा अधिक दृढ करणे हा महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. तीन दिवसीय महोत्सवात सर्व वयोगटांतील नागरिकांचा सहभाग राहील, अशा पद्धतीने विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. नाट्यरसिकांसाठी दर्जेदार व लोकप्रिय व्यावसायिक मराठी नाटकांचे विशेष प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील नामवंत गायक-कलाकारांच्या सहभागातून भावगीत, नाट्यगीत, भक्तिगीत तसेच लोकप्रिय मराठी-हिंदी गीतांचा समावेश असलेली संगीत मैफल आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक लावणीचे सादरीकरण, तरुणाईसाठी आधुनिक संगीत आणि फ्यूजनचा समावेश असलेला रॉक बँड परफॉर्मन्स तसेच विविध सामाजिक विषय, हास्य-विनोद आणि समकालीन आशय मांडणाऱ्या नामवंत कवींचे राज्यस्तरीय कवी संमेलन हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

# माळशेज-भोरांडे पंप स्टोरेज प्रकल्पाचे काम तातपुरते स्थगित

खासदार डॉ. अमोल कोल्हे



■ नारायणगाव (दै. संध्या)

माळशेज-भोरांडे पंप स्टोरेज प्रकल्पाबाबत बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीत प्रकल्पाच्या पर्यावरणीय अहवालासह पाणी उपलब्धता, कायदेशीर बाबी आणि माळशेज भोरांडे व खुबी येथील प्रस्तावित प्रकल्पांच्या एकत्रित पर्यावरणीय परिणामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या उपस्थित झालेल्या या बैठकीला खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, माजी खासदार शिवाजीदादा आढळराव पाटील, माजी आमदार अतुल बेनके, अजित भयंकर यांच्यासह महाराष्ट्राचे प्रदूषण नियंत्रण मंडळ, जलसंपदा विभाग आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला सह्याद्री वाचवा संघर्ष समिती व इतर संघटनांच्या प्रतिनिधींनी शासनाने अदानी ग्रीन एनर्जीसोबत केलेला करार पेसा कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याचा आरोप करत तो रद्द करण्याची मागणी केली. ग्रामसभांना विश्वासात न घेता अशा प्रकारचा प्रकल्प लादणे योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी देवराम लांडे, किरण लोहकरे, डॉ. अमोल वाघमारे, दत्ता गवारी, अॅड.नाथा शिंगाडे, सोमनाथ निर्मळ, अरुणा घोटकर, दीपक बुळे,संतोष तळपे, मंगेश अढारी आणि अनिता रेंगडे यांनी विविध आक्षेप व मागण्या मांडल्या. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले.पर्यावरणीय अहवालाच्या तपासणीची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची असताना त्यांनी सदर अहवालाची पुरेशी तपासणी केली नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. नवीन पर्यावरणीय अहवालाची प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे तपासणी करावी. अशी सूचना ही त्यांनी केली. २१ तारखेला प्रस्तावित जन सुनावणीसाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरणीय मूल्यमापन अहवालात गंभीर त्रुटी असल्याचे बैठकीत निदर्शनास आले. त्यामुळे नवीन पर्यावरणीय मूल्यमापन अहवाल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विद्यमान अहवाल तयार करणाऱ्या एजन्सीने आवश्यक ती गांभीर्याने व सखोल माहिती संकलित केली नसल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. त्यामुळे संबंधित एजन्सी बदलून दुसऱ्या सक्षम एजन्सीमार्फत नवीन पर्यावरणीय अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

माळशेज- भोरांडे आणि खुबी येथे दोन वेगवेगळ्या कंपन्यांचे प्रकल्प प्रस्तावित असले तरी या दोन्ही प्रकल्पांचा जुन्नर तालुक्याच्या पश्चिम भागातील पर्यावरणावर एकत्रित परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांचा एकत्रित पर्यावरणीय अभ्यास करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रकल्पासाठी पाण्याची मंजुरी काळू नदीतून असल्याचे सांगण्यात येत असले, तरी पूर्वीच्या अहवालात पाणी माणिकडोह धरणातून घेण्यात येणार असल्याचा उल्लेख होता. कुकडी प्रकल्पात पाणीसाठा शिल्लक नसल्याने नवीन बंधाऱ्यांना परवानगी दिली जात नसल्याच्या पार्श्वभूमीवर प्रकल्पाच्या पाणी परवानगीचा सविस्तर अभ्यास करण्याचे ठरले.

काळू नदी आणि कुकडी नदीच्या पाण्याचा ताळेबंद तसेच प्रकल्पासाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नवीन पर्यावरणीय अहवाल तसेच दोन्ही प्रकल्पांचा एकत्रित पर्यावरणीय अभ्यास पूर्ण झाल्यानंतर हे दोन्ही अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने काटेकोरपणे तपासावेत. अशा सूचना देण्यात आल्या. तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्यास त्या दूर करून अंतिम अहवाल तयार करावा. त्यानंतर संपूर्ण अहवाल मराठी भाषेत तयार करून संबंधित स्थानिक ग्रामसभांना पाहण्यासाठी उपलब्ध करून द्यावा आणि त्यानंतरच पुढील प्रक्रिया राबवावी, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

वरील सर्व बाबींची पूर्तता करण्याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना सूचना दिल्या.बुधवारी झालेल्या बैठकीत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी ज्या कायदेशीर त्रुटी प्रशासनाच्या निदर्शनास आणल्या व त्यावर प्रशासनाला निर्णय घ्यायला भाग पाडले त्याबद्दल आदिवासी समाज बांधवांनी समाधान व्यक्त केले. आता वरील निर्णयावर अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत ही प्रक्रिया अनिश्चित काळासाठी पुढे ढकलली गेली आहे.

या बैठकीला सभापती कमलताई शेळकंडे, सुरज वाजगे, अॅड.ललित जोशी, सुरेखाताई मुंढे,संजय साबळे, सरपंच प्रतिनिधी गोविंद साबळे, निलेश रावते, सुमनताई लांडे, महादू निर्मळ, मंगल चिमटे, पुष्पा डामसे, कांता विरनक, हेमलता भालचिम ,उषा चिमटे, किरण शेळकंडे, मनोज नांगरे, बाळू अप्पा केदारी, अजित बांगर, विठ्ठल रढे, नीता कारभळ, ज्योत्स्ना मुंढे, नीलम घोलप,अनिता रेंगडे ,दिपाली पाटेकर, अरुणा मस्करे,गणेश मराडे ,विजय काठे, प्रदीप भांगे, शुभम उंडे ,शंकर बांबळे, संतोष रावते ,श्री. किरण लोहकरे, डॉ. अमोल वाघमारे, सोमनाथ निर्मळ यांच्यासह विविध गावांतील कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### फुकोकू इंडिया कंपनीच्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये २० विद्यार्थ्यांची निवड

नारायणगाव : दैनिक संध्या

२० ऑगस्ट रोजी ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथे फुकोकू इंडिया प्रा. लि.,चाकण या जपानी कंपनीच्या वतीने कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखतीसाठी परिसरातील विविध महाविद्यालयांतील १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कंपनीचे मानव संसाधन प्रमुख दिपक कुलकर्णी तसेच ऋषिकेश सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. पदवीधर तसेच डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांना या रोजगार संधीमध्ये सहभागी होता आले. या कॅम्पस इंटरव्ह्यूमधून एकूण २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये रोजगाराची संधी मिळणार असून, या माध्यमातून स्थानिक युवकांना नामांकित जपानी कंपनीमध्ये करिअरची संधी उपलब्ध झाली आहे. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पस ड्राइव्हमुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराच्या संधींबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महाविद्यालयाच्या वतीने कंपनीच्या प्रतिनिधींचे तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य आनंद कुलकर्णी यांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कॅम्पस ड्राइव्हच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. दिनेश गाजूलवार, प्रा. अंकुश पिंगळे व प्रा. आकाश कांबळे तसेच सर्व विभाग प्रमुखांनी विशेष परिश्रम घेतले.

### बारामती औद्योगिक वसाहतीमधील उद्योग व आस्थापना प्रतिनिधींची बैठक

बारामती : दैनिक संध्या

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या 'रोजगार महाकुंभ मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी बारामती औद्योगिक वसाहतीमधील उद्योग व आस्थापना प्रतिनिधींची पुर्वतयारी आढावा बैठक घेण्यात आली. या रोजगार मेळाव्यात मोठ्या प्रमाणात तरुण-तरुणींनी, महाविद्यालयांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी केले आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योजकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या 'रोजगार महाकुंभ मेळाव्यात बँकिंग, फायनान्स, मॅन्युफॅक्चरिंग आणि ऑटोमोटिव्ह यांसारख्या विविध क्षेत्रांतील भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी उद्योजक प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करून बारामती परिसरातील सर्व औद्योगिक आस्थापना, व्यावसायिक सस्था, आणि बँकिग क्षेत्रातील उद्योजक प्रतिनिधीनी आपल्याकडील रिक्तपदाची माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांच्याकडे सादर करुन उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे,असेही श्री. पाटील म्हणाले. या बैठकीस कार्यकारी अभियंता विजय पेठकर, बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे धनंजय जामदार, बारामती क्लस्टरचे प्रमोद काकडे,शरद सूर्यवंशी, करिअर वर्ल्ड अॅग्रो टीमचे हरिश खाडे, तसेच रा. दे. डोईफोडे, आणि कनिष्ठ कौशल्य विकास अधिकारी सचिन ढेरे आदी उपस्थित होते.

### धोलवड येथे रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नारायणगाव : दैनिक संध्या

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून धोलवड येथे एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'निर्मल ग्रामपंचायत धोलवड', 'शिवनेरी प्रतिष्ठान धोलवड' आणि 'शिवनेरी ब्लड बँक, नारायणगाव' यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या शिबिराला स्थानिक तरुणांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पीएसआय संदीप मुंढे आणि ग्रामपंचायतीचे सरपंच वैभव नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरामध्ये सुमारे १०० हून अधिक नागरिकांनी आपली प्राथमिक नोंदणी केली होती. त्यापैकी ७४ जणांनी प्रत्यक्ष रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या प्रसंगी उपसरपंच सोमनाथ नलावडे, पोलिस पाटील गौरी काळे,ग्रामपंचायत अधिकारी एस. आल्हाट , शिवनेरी विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन यांच्यासह अनेक ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान करण्यापूर्वी डॉक्टरांच्या विशेष पथकाद्वारे सर्व रक्तदात्यांची सविस्तर आरोग्य तपासणी करण्यात आली. योग्य तपासणीनंतरच त्यांना रक्तदानाची परवानगी देण्यात आली. रक्तदान करणाऱ्या सर्व नागरिकांना त्यांच्या या योगदानाबद्दल रक्तदात्याचे प्रमाणपत्र आणि विशेष भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवनेरी प्रतिष्ठानचे सर्व सदस्य, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि शिवनेरी विद्यालयाच्या १९९९ च्या एसएससी बॅचने विशेष परिश्रम घेतले.

### शिरूरमध्ये अवैध धंद्यांना पुन्हा ऊत; 'नव्याचे नऊ दिवस' संपले का?


शिरूर : दैनिक संध्या




शिरूर शहरासह तालुक्यात जुगार, मटका, गुटखा, बेकायदा दारू विक्री, अवैध वाहतूक व उत्खनन यांसारख्या प्रकारांना पुन्हा ऊत आल्याची चर्चा असून, नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वी पोलिसांकडून कडक कारवाई होत असताना आता कारवाई मंदावल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सुरुवातीच्या काळात कडक कारवाई केल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. मात्र, आता पुन्हा अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी होत असल्याने 'साहेब, नव्याचे नऊ दिवस संपले का?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अवैध व्यवसायांमुळे तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात जाण्याचा धोका असून, अनेक कुटुंबांमध्ये आर्थिक व कौटुंबिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे केवळ अधूनमधून कारवाई न करता अवैध धंद्यांवर सातत्याने आणि मुळापासून कारवाई करण्याची गरज आहे. अवैध धंद्यांना कोणाचे पाठबळ आहे का, राजकीय किंवा अन्य दबावामुळे कारवाईवर मर्यादा येतात का, याचीही निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी नागरिकांची मागणी आहे. कोणावरही पुराव्याशिवाय आरोप न करता चौकशीअंती दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शिरूर शहर व तालुक्यात कायद्याचा धाक कायम ठेवून नागरिकांचा पोलिस प्रशासनावरील विश्वास दृढ करण्यासाठी अवैध धंद्यांविरोधात सातत्यपूर्ण कारवाई करणे आवश्यक आहे. आता पोलिस प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## बेल्हे येथील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

■ नारायणगाव (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील श्री बेल्हेश्वर विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

फेब्रुवारी-एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर उत्तम गुण मिळवले आहेत.या परीक्षेत शाळेतील कल्पेश विनायक पिंगट याने २१४ गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. तसेच मंदार विठ्ठल कोकणे याने २३८ गुण आणि प्रणित संतोष शिंदे याने २३६ गुण मिळवत विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे गुण कौतुकास्पद आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशात शाळेतील शिक्षकांचे मोलाचे योगदान राहिले आहे. शिष्यवृत्ती विभागप्रमुख नितीन मुळुक, यांच्यासह मार्गदर्शक शिक्षक सीमा सुपेकर, मंगेश नाडेकर, विठ्ठल पांडे, रेखा पेटारे, सुरेश साबळे, गोपाल फंगाळ आणि तुषार नांगरे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी विशेष परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे पर्यवेक्षक दत्तात्रय खोरे, शाळा समिती, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, विविध समित्यांचे सदस्य आणि बेल्हे ग्रामस्थांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## कर्कश आवाजाच्या दुचाकींवर जुन्नर पोलिसांची कारवाई

■ नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर शहरात आणि परिसरात सायलेन्सरमध्ये बेकायदेशीर बदल करून, रस्त्यांवर सुसाट धावताना कर्कश आवाज करणाऱ्या दुचाकीस्वारांवर जुन्नर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.जुन्नर पोलिसांनी तब्बल १० दुचाकींवर धडक कारवाई केली असून सर्व वाहने जप्त केली आहेत.

पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील त्रस्त नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. जुन्नर शहर व आसपासच्या भागात अनेक दुचाकीस्वारांनी आपल्या वाहनांचे मूळ सायलेन्सर बदलून त्याठिकाणी सुधारित सायलेन्सर बसवले होते. या सायलेन्सरमुळे परिसरात प्रचंड कर्कश आणि फटाक्यांसारखा मोठा आवाज निर्माण केला जात होता. यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.या समस्येची गंभीर दखल घेत जुन्नर पोलिसांनी शहरात विशेष वाहतूक नियम अंमलबजावणी मोहीम राबवली.


या मोहिमेदरम्यान पोलिसांना फटाक्यांसारखा मोठा आवाज करणाऱ्या ४ बुलेट आणि सायलेन्सर बदलून कर्कश आवाज करणाऱ्या इतर ६ दुचाकी आढळून आल्या. पोलिसांनी त्वरित कारवाई करत या सर्व १० दुचाकी आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. तसेच वाहनांचे अवैध सायलेन्सर बदलणाऱ्यांवरही कडक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

अधिकृत तपासणीसाठी प्रादेशिक परिवहन विभागाकडे पत्र पाठविण्यात आले आहे. आरटीओ अधिकाऱ्यांकडून या वाहनांचा सविस्तर तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, मोटार वाहन कायद्यानुसार संबंधित वाहनचालकांवर पुढील कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. ही मोहीम पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीपणे राबवण्यात आली. या कारवाईमध्ये वाहतूक पोलीस हवालदार गणेश शिंदे, दीपक वणवे,कैलास केंद्रे व वाहतूक सेवक उमेश कागदी यांच्या विशेष पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

वाहतूक नियमांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे, शहरात शांतता राहावी आणि अवैध सायलेन्सरमुळे नागरिकांना होणारा त्रास पूर्णपणे बंद व्हावा, याच उद्देशाने ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. जुन्नर शहर व परिसरात यापुढेही अशा प्रकारे नियमबाह्य वाहन चालवणाऱ्या आणि शांतता भंग करणाऱ्या वाहनांवर सातत्याने कडक कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाची प्रतीक्षा

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)



राज्य शासनाच्या प्रस्तावित कर्जमाफी योजनेत नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट केल्याने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मात्र, या अनुदानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांना पीक उत्पादनासाठी अल्पमुदतीचे पीक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या कर्जाची मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाच्या डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ मिळतो. या योजनेमुळे पीक कर्जावरील व्याजदरात तीन टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असल्याने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळतो. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी यंदाही पीक कर्जाची वेळेत परतफेड केली आहे. त्यामुळे शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभाची शेतकरी आतुरतेने वाट पाहत आहेत.

कर्जमाफीबाबत शासनाने दिलेला शब्द पाळावा, त्याचबरोबर नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही कोणतीही अट न ठेवता प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान तातडीने द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. कर्जाची नियमित परतफेड करूनही प्रोत्साहनपर अनुदान अद्याप मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये काहीशी नाराजी असली, तरी शासनाकडून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेची अंमलबजावणी लवकर झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे आता शासनाच्या पुढील निर्णयाकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

## कान्हाटी : आस लागली बाप्पा... तुझ्या आगमन सोहळ्याची

■ कान्हाटी (दै. संध्या)



बारामतीच्या पश्चिम पट्ट्यात गणरायाच्या गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरु झाली असून शहरात आतापासूनच झळकलेले बाप्पांच्या आगमनाचे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. दरम्यान, मूर्तिकार देखील आता श्रीगणेशाच्या मुर्ती तयार करण्याच्या कामात व्यस्त दिसत आहेत. पुढील महिन्याच्या १४ तारखेला गणेशोत्सवाला प्रारंभ होणार आहे. सध्या ग्रामीण भागातील विविध गणेश मंडळाकडून जोरदार तयारी सुरु झाली आहे. अनेक ठिकाणी स्वागताचे फलक झळकले आहेत. श्रीगणेशाची मूर्ती यंदा कशी खरेदी करायची, डेकोरेशन कसे करायचे, कुठले कार्यक्रम घ्यायचे या व इतर तयारीत गणेशभक्त दिसत आहेत. मूर्तिकार देखील आता श्रीगणेशाच्या मूर्ती तयार करण्याच्या कामात व्यस्त झाले आहेत. तयार होणाऱ्या गणेशमूर्तिंना मोठी मागणी असते. गणेशोत्सव आता तोंडावर आला असून अनेक गणेश मंडळानी मूर्तिची बुकिंग केली आहे. त्यानुसार मूर्ती तयार करण्याचे काम सध्या सुरु असल्याचे काही मूर्तीकारांनी सांगितले.

## सुनेने मांडला सासऱ्याच्या घराच्या उंबरठ्यावर भानामतीचा डाव

जादूटोणा प्रकरणी तिघांसह दोन महिलांविरुद्ध गुन्हा : नात्याला काळिमा फासणारी घटना; अंधश्रद्धेच्या वाढत्या प्रकारांमुळे जेजुरी परिसरात चिंता

■ पुरंदर (दै. संध्या)





सासऱ्याच्याच घराच्या दरवाजाजवळ कथित भानामती व जादूटोण्याचा प्रकार केल्याप्रकरणी जेजुरी पोलिसांनी तीन जणांसह दोन अनोळखी महिलांविरुद्ध महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. रोमणवाडी-पांडेश्वर येथील या घटनेमुळे पुरंदर परिसरात खळबळ उडाली असून, नातेसंबंधांतील अविश्वासाची दरी अधिकच वाढत असल्याची चर्चा आहे.

रोहीदास दिनकर जाधव (वय ७८, रा. रोमणवाडी, पांडेश्वर, ता. पुरंदर) यांनी जेजुरी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार नीलम हनुमंत मगर, अक्षय ऊर्फ बंटी हनुमंत मगर (जोगता) तसेच दोन अनोळखी महिला (सर्व रा. लोणी काळभोर, खोकलाई चौक, ता. हवेली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास रोमणवाडी, पांडेश्वर येथे जाधव यांच्या घराच्या दरवाजालगत भिंतीजवळ लाल रंगाचे कापड टाकण्यात आले होते. त्यावर नारळ ठेवून त्याला काळ्या रंगाची बाहुली बांधण्यात आली होती. तसेच सुमारे २० लिंबांना लोखंडी टाचण्या टोचलेल्या अवस्थेत आढळून आल्या. या साहित्याजवळ हळद, कुंकू, बुका, अर्धवट कापलेले कवठ, लिंबू तसेच कुंकवाचे लाल पाणी टाकण्यात आले होते, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित व्यक्तींनी घरासमोर भानामतीची प्रथा व जादूटोणा केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या घटनेमुळे केवळ एका कुटुंबातील वाद नव्हे, तर समाजातील वाढत्या अंधश्रद्धेचाही प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. काही ठिकाणी आजही भानामती, करणी आणि जादूटोणा यांसारख्या अघोरी प्रथांवर विश्वास ठेवला जात असल्याच्या चर्चा असून, अशा प्रकारांमुळे नातेसंबंधांत संशय आणि अविश्वास निर्माण होत असल्याचे चित्र आहे. वडिलांसमान असलेल्या सासऱ्यालाच सुनेविरोधात पोलिसांत तक्रार करण्याची वेळ येणे, हे नातेसंबंधांना काळिमा फासणारे दुर्दैवी वास्तव असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशन गु.र.नं. २५३/२०२६ अन्वये महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ चे कलम ३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास स.फौ. कारंडे करीत असून, पोलीस निरीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पो. ह.वा. पखाले यांनी केली.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### विद्यार्थ्यांच्या हिताचा सकारात्मक निर्णय

चंद्रपूर : आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला सर्वोच्च प्राधान्य देत वसतिगृह प्रवेशासंदर्भातील विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर राज्य शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. वसतिगृह प्रवेशासाठी आंदोलन करणाऱ्या युवक-युवतींना विश्वासात घेऊन त्यांच्याशी दोन दिवस सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. ग्रामीण व दुर्गम भागातील गोरगरीब आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ वसतिगृह प्रवेशाअभावी थांबू नये, यासाठी आदिवासी विकास विभाग विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, असे राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी स्पष्ट केले. आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात एकूण 490 शासकीय वसतिगृहे चालविण्यात येतात. या वसतिगृहांमध्ये दरवर्षी सुमारे 58 ते 60 हजार विद्यार्थी निवास करून शिक्षण घेतात. वसतिगृह प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाने 14 ऑगस्ट 2026 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या शासन निर्णयाच्या अधीन राहून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून आवश्यक सहकार्य करण्याची भूमिका विभागाने घेतली आहे. वसतिगृह प्रवेशाची वयोमर्यादा किमान 30 वर्षे असावी, या मागणीच्या अनुषंगानेही सकारात्मक विचार करण्यात आला आहे. यावर्षी नवीन शासन निर्णय लागू झाल्यामुळे वयाची 30 वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये तसेच कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी अशा विद्यार्थ्यांना 'स्वयम' योजनेच्या धर्तीवर आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभाग सहकार्य करणार आहे. विशेष म्हणजे केवळ पारंपरिक अभ्यासक्रमच नव्हे, तर पीएच.डी., एम.फिल., पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण तसेच इतर विविध अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या 30 वर्षांवरील विद्यार्थ्यांनाही शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळू शकला नाही, तर त्यांना 'स्वयम' योजनेचा लाभ देण्याची भूमिका घेण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नांकडे शासन संवेदनशीलतेने पाहत असून आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संवादातून सकारात्मक मार्ग काढण्यावर भर देण्यात आला आहे. याबाबत विद्यार्थ्यांशी सकारात्मक चर्चा सुरू असून विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घ्यावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### गणेशपूर होणार 'कवितेचे गाव'; लाखनी 'पुस्तकांचे गाव'

भंडारा : मराठी भाषा विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यात 'कवितेचे गाव' आणि 'पुस्तकांचे गाव' विकसित करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. भंडारा जिल्ह्यातील कवी ना. रा. शेंडे यांचे गणेशपूर हे गाव 'कवितेचे गाव', तर ज्येष्ठ लेखक द. सा. बोरकर यांचे लाखनी हे गाव 'पुस्तकांचे गाव' म्हणून विकसित करण्यात येणार असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज केली. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिकांशी मंत्री डॉ. सामंत यांनी संवाद साधला. यावेळी मराठी शाळा सुरू राहाव्यात, मराठी भाषेला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, तसेच मराठी साहित्य आणि मराठी भाषा विभाग यांच्यात अधिक प्रभावी संवाद निर्माण व्हावा, याबाबत साहित्यिकांनी विविध सूचना मांडल्या. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा विभागासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करून त्यासाठी मराठी भाषा अधिकारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.

### माती आणि पाण्याचा जपून वापर करावा

नाशिक : माती आणि पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तीचा वापर प्रत्येकाने आवश्यकतेनुसार करावा. याच भूमिकेतून माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी 'पाणी अडवा पाणी जिरवा' हा संदेश दिला होता. त्यानुसार पृथ्वीच्या संरक्षणासाठी माती आणि पाण्याचे संवर्धन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले. राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागातर्फे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी डोंगरे वसतीगृह मैदान येथे महा वॉकेथॉन, वॉक फॉर वॉटरचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. गेडाम बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मृद व जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता हरिभाऊ गिते, जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी राजाराम झुरावत आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांना जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली.

# 'महा वॉकेथॉन'मधून एक पाऊल जलसंपन्न महाराष्ट्रासाठी

## 'महा वॉकेथॉन: वॉक फॉर वॉटर २०२६'ला सेलिब्रेटी, तरुणाई, सामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ मुंबई (दै. संध्या)

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणातील उल्लेखनीय कामाचा आदर्श घेत त्यांची जयंती २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले. त्यानुसार राज्यात सर्व जिल्ह्यात 'महा वॉकेथॉन: वॉक फॉर वॉटर २०२६' आयोजित करण्यात आली. यामाध्यमातून माती व पाण्याचे महत्त्व सांगत एक पाऊल जलसंपन्न महाराष्ट्र घडविण्यासाठी पडले आहे, अशी भावना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज व्यक्त केली.

वरळी येथील सागर पॉईंटजवळ आयोजित राज्यस्तरीय 'महा वॉकेथॉन: वॉक फॉर वॉटर २०२६' या उपक्रमाच्या कार्यक्रम प्रसंगी मंत्री राठोड बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, गायक संजू राठोड आदी उपस्थित होते.

मंत्री संजय राठोड म्हणाले, माती जपा, पाणी वाचवा आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवा, या संदेशातून राज्यात आयोजित करण्यात आलेल्या 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. राज्यात सर्व जिल्ह्यात आयोजित या वॉकेथॉनमध्ये तीन लाखांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला आहे. माती आणि पाणी संवर्धनासाठी लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने मृद व जलसंधारण विभागाने हा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.

जलसंधारणासारख्या महत्त्वाच्या विषयावर मंत्रालयात केवळ बैठक किंवा सभागृहातील कार्यक्रम घेण्याऐवजी लोकांमध्ये जाऊन जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. माती आणि पाणी हे राज्याच्या भवितव्याशी निगडित विषय असून, त्यांच्या संवर्धनासाठी शासनाच्या प्रयत्नांना जनतेची साथ मिळणे आवश्यक आहे. विशेषतः युवकांनी या विषयाशी जोडले जाऊन जलसंधारणाच्या चळवळीला बळ द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी जलसंधारणाच्या कामांना संस्थात्मक स्वरूप देत 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या विचाराला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप दिले. भविष्यातील महाराष्ट्रासाठी माती आणि पाण्याचे महत्त्व मंत्री राठोड यांनी यावेळी अधोरेखित केले.



माती वाचवा, पाणी जिरवा आणि पाणी वाचवण्याची संकल्पना तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित 'महा वॉकेथॉन' हा अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे. पाणी ही प्रत्येकाची गरज असून जात-धर्माच्या पलीकडे जाऊन जलसंधारणाचा विचार जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद ही भविष्यातील पिढ्यांसाठी जलसंधारणाची लोकचळवळ उभी राहण्याची आशादायी सुरुवात आहे, असे उपसभापती अहिर यांनी सांगितले.

जलसंधारण दिनानिमित्त आयोजित महा वॉकेथॉनसारख्या उपक्रम कौतुकास्पद आहे. पावसाचे पाणी वाहून जाताना सुपीक मातीही वाहून जाते आणि पाणी जमिनीत मुरत नाही. त्यामुळे जल व मृदसंधारणासाठी लोकसहभाग वाढविणे गरजेचे आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुपीक जमीन आणि पाण्याची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने जलसंधारणाच्या कामात सहभागी व्हावे, असे आवाहन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांनी दूरदृष्टीने मृद व जलसंधारण विभागाची निर्मिती केली असून, त्यांनी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा संदेश प्रत्यक्षात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

राज्यस्तरीय महा वॉकेथॉनचा शुभारंभ आरे दुग्ध वसाहतीजवळ सागरी किनारा रस्त्यालगत प्रोमोनेट येथून करण्यात आला. यावेळी माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तुळशी रोपाला जल अर्पित करुन जलपूजन करण्यात आले. यावेळी माती व जलसंधारणाच्या संवर्धनासाठी उपस्थितांना शपथ देण्यात आली. यानंतर महा वॉकेथॉनची झेंडी दाखवून मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. अभिनेते पुष्कर श्रोत्री, क्रिकेटर इरफान पठाण, जॅकी भगनानी, रजनीश दुग्गल, संजीव-श्रवण, अनिल सिंग, झहीर शेख जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, ग्रामविकास विभागाचे सचिव श्रीकांत पुलकुंडवार, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी, स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक, सांस्कतिक, कला, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्याने यावेळी उपस्थित होते.

जलसंधारणाचे महत्व सांगणारी आणि महाराष्ट्राला जल सुरक्षेचा संदेश देणाऱ्या महा वॉकेथॉनमध्ये मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी संपूर्ण अंतर सहभागींसमवेत पायी चालून पूर्ण केले. त्यांच्यासोबत विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, तसेच इतर विभागांचे सचिव सहभागी झाले होते. सर्वांनी सहभागीदारांसमवेत पायी चालत त्यांचा उत्साह वाढविला.

राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान "जलसंधारण सप्ताह" आयोजित करणात आला. तर १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ या कालावधीत "जलसंधारण अभियान" राबवण्यात येत आहे. मुंबई, दि.२१: माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणातील उल्लेखनीय कामाचा आदर्श घेत त्यांची जयंती २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले. त्यानुसार राज्यात सर्व जिल्ह्यात 'महा वॉकेथॉन: वॉक फॉर वॉटर २०२६' आयोजित करण्यात आली. यामाध्यमातून माती व पाण्याचे महत्त्व सांगत एक पाऊल जलसंपन्न महाराष्ट्र घडविण्यासाठी पडले आहे, अशी भावना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज व्यक्त केली.

वरळी येथील सागर पॉईंटजवळ आयोजित राज्यस्तरीय 'महा वॉकेथॉन: वॉक फॉर वॉटर २०२६' या उपक्रमाच्या कार्यक्रम प्रसंगी मंत्री राठोड बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, गायक संजू राठोड आदी उपस्थित होते. मंत्री संजय राठोड म्हणाले, माती जपा, पाणी वाचवा आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवा, या संदेशातून राज्यात आयोजित करण्यात आलेल्या 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. राज्यात सर्व जिल्ह्यात आयोजित या वॉकेथॉनमध्ये तीन लाखांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला आहे. माती आणि पाणी संवर्धनासाठी लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने मृद व जलसंधारण विभागाने हा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.

## ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या छायाचित्र प्रदर्शनाची भव्य सांगता

■ ठाणे(दै. संध्या)

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ आणि ठाणे महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वृत्तपत्र छायाचित्रकारांच्या छायाचित्रांचे भव्य प्रदर्शन आयोजित केले होते. या तीन दिवसीय प्रदर्शनाचा समारोप सोहळा आणि छायाचित्रकारांचा सत्कार राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, पत्रकार संघाचे अध्यक्ष दिलीप शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ आणि ठाणे महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ ऑगस्ट दरम्यान ठामपा मुख्यालयात १५० छायाचित्रांचे भव्य प्रदर्शन आयोजित केले होते. ठाण्यातील २२ छायाचित्रकार आणि १२ हौशी छायाचित्रकारांचे छायाचित्रांनी ठाण्यातील सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि विकासाचे चित्र टिपले. अशा या छायाचित्रकारांचा गौरव कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, पत्रकार संघाचे अध्यक्ष दिलीप शिंदे, नौपाडा कोपरी प्रभागाच्या सभापती मीनल संख्ये, नगरसेवक सीताराम राणे, ठाणे सिव्हिल सर्जन डॉ. कैलास पवार, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, कै. यशवंतराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य कैलाश म्हापदी आदी मान्यवरांच्या हस्ते झाला. ठाण्यातील ३४ छायाचित्रकारांचे एकाचवेळी मंत्र्यांच्या हस्ते सत्कार होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

यावेळी दिलीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली निवडून आलेल्या १३ सदस्यीय कमिटीचा मंत्री सरनाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संपूर्ण छायाचित्रे पाहून सर्वांचे कौतुक केले. आपल्या भाषणात सर्वांचे कामाचे कौतुक करताना ना. सरनाईक यांनी नगरसेवक असताना केलेल्या आंदोलनापासून महासभेपूर्वी विषयाची पत्रकारांशी चर्चा करून कशी तयारी करत असू अशा जुन्या आठवणींना उजाळा दिला.

तसेच सर्वोत्तोपरी मदत करण्याचे आश्वासनही देत पत्रकार संघाच्या नवीन समितीकडून होणाऱ्या कामाचे भरभरून कौतुक केले. तर आमदार संजय केळकर सर्व पत्रकार, छायाचित्रकार आणि संघाच्या संघर्ष आणि त्याच्या मेहनतीबाबत कौतुकाची थाप दिली.

## राजधानीत सद्भावना दिन साजरा

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या 82 व्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त व सचिव डॉ. श्वेता सिंघल यांनी महाराष्ट्र सदन येथे राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

यावेळी श्रीमती सिंघल यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व पोलीस जवानांना सद्भावना प्रतिज्ञा दिली. जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गांनी सोडवण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी घेतली.

दिवंगत राजीव गांधी यांची जयंती सदभावना दिवस म्हणून साजरी करण्यात येते.

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक सारिका शेलार, प्रमोद कोलपटे यांच्यासह महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही राजीव गांधी यांना आदरांजली अर्पण केली.

# जलसंधारण : काळाची गरज

**१५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा जलसंधारण दिन त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे. या जलसंधारण अभियानाच्या निमित्ताने जलसंधारणाच्या विविध उपाययोजनाविषयी माहिती देणारा हा लेख....**

कमी पाण्यामध्ये जास्त फायदा घेण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजना आपल्या शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतीमधील पिकांमध्ये तसेच उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होऊ शकते. त्याबरोबरच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा काटकसरीने वापर केला जाऊ शकतो व कमी पाण्यात बहारदार शेतीचा प्रयोग करता येऊ शकतो या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजनांचा कल्पकतेनं वापर केला पाहिजे.

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर करताना पाऊसमान, जमिनीचा प्रकार, उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन या बाबी लक्षात घ्याव्यात. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत.

जमिनीच्या उतारानुसार जमिनीचे निरनिराळे भाग करावेत. त्यानुसार बांध टाकावेत, बांधाच्या आतील भागाचे सपाटीकरण करावे. सध्याच्या काळात फुटलेले बांध दुरुस्त करावेत. योग्य ठिकाणी सांडवा ठेवावा. त्यामुळे जादा झालेले पाणी सुरक्षितरीत्या शेताबाहेर काढता येते. सांडव्यामधून माती वाहून जाऊ नये म्हणून त्यामध्ये दगडी बांध घालावेत. मातीचे बांध पुन्हा पावसाने फुटू नयेत यासाठी पावसाळ्यात त्यावर स्टायलो, मद्रास अंजन, खस, सुबाभूळ, ग्लिरिसिडियाची लागवड करावी.

जमिनीची प्राथमिक मशागत केल्यानंतर पाऊस जागच्या जागी मुरविण्यासाठी मूलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करावा. शेतामध्ये जादा होणारे पाणी शेताबाहेर काढण्यासाठी योग्य ठिकाणी ढाळीचे बांध ठेवावेत. जादा झालेले पाणी हे पाणी वाहून नेणाऱ्या चरामध्ये सोडावे. हा चर गवताने आच्छादित करावा. चराच्या उताराबद्दल काळजी घ्यावी. त्यामुळे जमिनीची धूप होत नाही. शेतातील जादा झालेले पाणी हे योग्य त्या तांत्रिक गोष्टींचा अवलंब करून विहीर किंवा कूपनलिका पुनर्भरणासाठी वापरावे. जादा झालेले पाणी वैयक्तिक किंवा सामूहिक स्तरावर शेततळे खोदून साठवावे. पाऊस, पाणलोट क्षेत्र, जमिनीचा प्रकार, उतार, पीक पद्धती इत्यादींचा विचार करून शेततळ्याचे आकारमान व ठिकाण ठरवावे. पाझर तलाव, बंधारे इत्यादींची साठवणक्षमता अबाधित ठेवण्यासाठी त्यामधील गाळ काढावा, त्यांची दुरुस्ती करावी.

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर हा पाऊसमान, जमिनीचा प्रकार, जमिनीचा उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन इत्यादी बाबी लक्षात घेऊन करावा. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत. या पद्धती अत्यंत परिणामकारक आणि कमी खर्चाच्या आहेत. या पद्धतीमध्ये जागच्या जागी जमिनीत पाणी मुरविले जात असल्यामुळे अभियांत्रिकी मृद व जलसंधारण पद्धतीपेक्षा बाष्पीभवन कमी होते.

अवर्षणप्रवण विभागात ८० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते. या प्रचलित रब्बी पीकपद्धतीमध्ये पावसाळ्यात म्हणजे खरीप हंगामात बहुधा पीक घेतले जात नाही. त्यामुळे खरीप हंगामात जमिनीस पिकाचे पांघरुण मिळत नाही. रब्बी हंगाम हा पिकांचा दुसरा हंगाम पावसाळ्याच्या शेवटी सुरू होतो. या हंगामात पिकांना प्रत्यक्ष पावसाचे पाणी फारसे मिळत नाही. खरीप हंगामात पडलेले पावसाचे पाणी भारी खोल जमिनीत खरीप पिके न घेता मुरविले जाते आणि जमिनीतील ओलावा वाढविला जातो. अशा जमिनीत रब्बी हंगामातील पिके चांगली येतात.

कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही, अशा ठिकाणी उताराला आडवे वाफे तयार करावेत. वाफे तयार करताना प्रथम कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर बळिराम नांगराने उभे-आडवे ६ मीटर x ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० सें.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठविली जाते.


मध्यम ते भारी जमिनीत बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावे. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्यांमधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यांपर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून माती वाहून जात नाही. सऱ्यांची लांबी साधारणतः ९० मीटरपर्यंत ठेवावी. या पद्धतीमुळे उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ दिसून येते. या पद्धतीत मुख्य वरंबे उताराला आडवे ठेवावेत, तर बंदिस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत. अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात. मुख्य वरंब्याची उंची ६ मीटर व उंची ३० सें.मी. ठेवावी, तर बंदिस्त वरंब्याची उंची २० सें.मी. व दोन वरंब्यांतील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून, त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. मृद व जलसंधारणाची अभियांत्रिकी कामे मूलस्थानी जलसंधारणाच्या कामांबरोबरच मृद व जलसंधारणाचे अभियांत्रिकी उपचार पाणलोट क्षेत्र विकासाच्या माथा ते पायथा या सूत्रानुसार करावेत.



दैनिक संध्या

शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६




www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews


## थोडक्यात पण महत्वाचे



### वांद्रेतील डिजिटल जाहिरात फलकांची चौकशी; ७ दिवसांत बैठक घेण्याचे निर्देश

**मुंबई : दैनिक संध्या**

वांद्रे (पूर्व) येथील टीचर्स कॉलनी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील एमएसआरडीसीच्या फुट ओव्हर ब्रिजवरील डिजिटल एलईडी जाहिरात फलकांची परवानगी, वैधता आणि सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने सखोल चौकशी करावी, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. विधानभवन येथे अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस मुंबई महानगरपालिका, एमएसआरडीसी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या फलकांवरील सतत बदलणाऱ्या जाहिराती व व्हिडिओंमुळे वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता बैठकीत व्यक्त करण्यात आली. जाहिरात फलकांच्या परवानगी प्रक्रियेतील कागदपत्रे, निविदा प्रक्रिया तसेच माहिती अधिकारांतर्गत मागविलेली संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेची तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. एमएसआरडीसीने सात दिवसांत संबंधित विभागांची बैठक घ्यावी. या बैठकीस वाहतूक पोलिसांच्या अधिकाऱ्यांना उपस्थित करून फलकांची वैधता, परवानगी प्रक्रिया आणि वाहतूक सुरक्षेचा आढावा घ्यावा तसेच सविस्तर अहवाल सादर करावा, असे अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले. अनियमितता किंवा गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.





### वैचारिक अपंगत्व दूर व्हावे - भैयाजी जोशी

**पुणे : दैनिक संध्या**

समाजातील वैचारिक अपंगत्व दूर करावे लागेल तर प्रत्येक नागरिक मानसिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेने योगदान देईल, ज्यामुळे आपला देश स्वावलंबी आणि शक्तिशाली होईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी यांनी भारत विकास परिषदेच्या कार्यक्रमात व्यक्त केले. भारत विकास परिषदेच्या पुण्यातील दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या देणगीदार आणि हितचिंतक संमेलनात ते बोलत होते. यावेळी प्रांत संघचालक नाना जाधव, विश्वस्त दत्ता चितळे, केंद्र प्रमुख विनय खटावकर, प्रमुख देणगीदार महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडच्या बागेश्री मंठाळकर, ढोले-पाटील शिक्षण संस्थेचे सागर ढोले पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोलताना जोशी पुढे म्हणाले की, देणगीदार या शब्दाऐवजी सहभागी झालेले अशा भूमिकेत सर्व समाज सामील झाला आणि आर्थिक योगदान निःस्वार्थपणे दिले तर ते जास्त अर्थपूर्ण ठरेल. सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य भारत विकास परिषद करीत आहे. आजपर्यंत भारत विकास परिषदेने ३० हजार कृत्रिम पाय मोफत बसवले असून, याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बुकमध्ये घेतली गेली आहे, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमात विविध प्रकारच्या विकलांग व्यक्तिंना कृत्रिम पाय बसवल्यानंतर, त्यांनी अनेक प्रकारच्या कवायती, हालचाली, धावणे, उडी मारणे, मांडी घालून बसणे, नृत्य करणे अशी प्रात्यक्षिके करून प्रेक्षकांना अचंबित केले. डॉ. विजय नाईक यांनी प्रात्यक्षिके करून घेतली. केंद्रप्रमुख विनय खटावकर यांनी मोफत विकलांग शिबिरांची माहिती दिली. दत्ता चितळे यांनी प्रास्ताविक केले, राजशेखर अभ्यंकर यांनी आभार मानले तर मंदार जोग यांनी सूत्रसंचालन केले.

### पुरंदर तालुका समन्वयकपदी चंद्रकांत झगडे यांची निवड

**पुरंदर : दैनिक संध्या**



क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त आयोजित विविध कार्यक्रम व उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत देवमळा जेजुरी ता. पुरंदर येथील चंद्रकांत बबन झगडे यांची पुरंदर तालुका समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचा व सामाजिक समतेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे समन्वयक म्हणून झगडे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महात्मा फुले द्विशताब्दी जयंती उत्सव समितीचे राज्य समन्वयक उत्तम गोरे, शाम गोरे, ॲड. नितीन म्हेत्रे, सुनील वांजरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जाणार आहे.

### गणेश बोत्रे यांच्या उपोषणाला राष्ट्रवादीच्या नगरसेवकांचा पाठिंबा

**चाकण : दैनिक संध्या**



अतिवृष्टीमुळे पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्ते कंपनीचे पहिल्याच पावसात पितळ उघडे पडले असून, चाकण पंचक्रोशीत पायाभूत सुविधा अक्षरशः कोडमडल्या आहेत, या सुविधा मार्गी लावण्यासाठी उपोषणात बसलेले जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांच्या उपोषणाला चाकण नगरपरिषदेच्या राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी पाठिंबा दिला आहे. चाकण उद्योग नगरीत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडल्याने सर्वांनाच मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यात वाहतूक कोंडीची मोठी भर पडली असून, नागरिक दररोज मरणयातना सहन करत आहेत. त्यामुळे आक्रमक झालेले जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे हे चाकण औद्योगिक भागातील एचपी चौकात उपोषणास बसले आहेत. त्यांच्या या उपोषणाला चाकण नगर परिषदेतील राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, गटनेते साहेबराव कड, नगरसेविका एड. वर्षा शेवकरी, आकाश जाधव, सागर बनकर, रेश्मा मुटके, धीरज मुटके, विजया जाधव, तृप्ती जगनाडे, विजया तोडकर आदी उपस्थित होते.

# पुरंदर तालुक्यात भैरव क्रांती सेनेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

### उपविभागीय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीमती वर्षा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शिबिरांचे आयोजन करण्याबाबत सकारात्मक निर्णय

■ पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील समाजबांधवांच्या विविध मूलभूत प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी भैरव क्रांती सेनेच्या वतीने अध्यक्ष विजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी पुरंदर उपविभागीय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीमती वर्षा लांडगे मॅडम यांच्या समवेत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.




पुरंदर तालुक्यात गेल्या अनेक महिन्यांपासून जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्था व भैरव क्रांती सेनेच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम व शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. आतापर्यंत पुरंदर तालुक्यात चार शिबिरांचे यशस्वी आयोजन झाले असून, या उपक्रमांना प्रशासनाने दिलेल्या सहकार्याबद्दल समाजबांधवांच्या वतीने श्रीमती वर्षा लांडगे मॅडम यांचे आभार मानण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या २८ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार १७ मूलभूत दस्तऐवज उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. या दस्तऐवजांमुळे पुरंदर तालुक्यातील हजारो भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. मात्र अनेक लाभार्थ्यांकडे आवश्यक मूळ कागदपत्रे उपलब्ध नसल्याने त्यांना अडचणी येत असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.

तसेच पिपरे ग्रामपंचायत व आक्सरवाडी परिसरात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या माध्यमातून भटक्या-विमुक्त समाजातील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेत आवश्यक दस्तऐवजांच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

याबाबत पुरंदर उपविभागीय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीमती वर्षा लांडगे यांनी सकारात्मक भूमिका घेत, नागरिकांना आवश्यक दस्तऐवज उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करून शक्य तितकी कागदपत्रे जागेवरच उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. तसेच संबंधित प्रशासनिक अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीमध्ये मरीआई, जोशी, गोपाळ, नंदीवाले, लमाण, गोसावी, नाथपंथी डवरी गोसावी, बेलदार, डोंबारी, कडकलक्ष्मी, वडार व रामोशी समाजांसह विविध भटक्या-विमुक्त समाजांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी पुरंदर उपविभागीय अधिकारी, पुरंदर तहसीलदार श्री. विक्रम राजपूत, निवासी तहसीलदार श्री. संदीप पाटील, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी, सासवड व जेजुरी नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी तसेच संबंधित प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समाजबांधवांच्या प्रश्नांवर केलेल्या सहकार्याबद्दल भैरव क्रांती सेनेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

> “भटक्या-विमुक्त समाजातील प्रत्येक पात्र नागरिकाला त्याच्या हक्काचे मूलभूत दस्तऐवज व शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी प्रशासन आणि समाजसंघटनांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. यासाठी भैरव क्रांती सेना सातत्याने पाठपुरावा करेल,” असे भैरव क्रांती सेनेचे अध्यक्ष विजय जाधव यांनी यावेळी सांगितले.

## फुकोकू इंडिया कंपनीच्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये २० विद्यार्थ्यांची निवड

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथे फुकोकू इंडिया प्रा. लि.,चाकण या जपानी कंपनीच्या वतीने कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखतीसाठी परिसरातील विविध महाविद्यालयांतील १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कंपनीचे मानव संसाधन प्रमुख (एच.आर. हेड) दिपक कुलकर्णी तसेच ऋषिकेश सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. पदवीधर तसेच डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांना या रोजगार संधीमध्ये सहभागी होता आले. या कॅम्पस इंटरव्ह्यूमधून एकूण २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये रोजगाराची संधी मिळणार असून, या माध्यमातून स्थानिक युवकांना नामांकित जपानी कंपनीमध्ये करिअरची संधी उपलब्ध झाली आहे. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पस ड्राइव्हमुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराच्या संधींबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महाविद्यालयाच्या वतीने कंपनीच्या प्रतिनिधींचे तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य आनंद कुलकर्णी यांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कारखान्याची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

■ नारायणगाव (दै. संध्या)

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या विस्तारीकरणामुळे कारखान्याची क्षमता वाढली आहे. आगामी काळात १२ ते १३ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्याची क्षमता निर्माण झाली असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी दिली. कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. कारखान्याची ४४ वी अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेची सुरुवात विघ्नहरचे संस्थापक अध्यक्ष स्व.निवृत्तीशेठ नामदेव शेरकर व स्व.सोपानशेठ नामदेव शेरकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून झाली. त्यानंतर अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले. या सभेस कारखान्याचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सत्यशील शेरकर यांनी सांगितले की, चालू हंगामात जर ११ ते १२ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप यशस्वीरित्या पूर्ण झाले, तर विस्तारीकरणासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे कारखान्याला सहज शक्य होणार आहे. त्यामुळे सभासदांनी जास्तीत जास्त ऊस लागवड करून आपल्या कारखान्याला ऊस पुरवावा, असे आवाहन त्यांनी केले. मागील गळीत हंगामात आलेल्या उसाचे संपूर्ण पेमेंट एफआरपीप्रमाणे अदा करण्यात आले असून, सभासदांची दिवाळी गोड केली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. कारखान्याने कार्यक्षेत्रातील एकरी ऊस उत्पादन वाढवण्यासाठी एक स्वतंत्र 'ऊस विकास विभाग' स्थापन केला आहे. या विभागासाठी नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी बुद्रुक आणि पाडेगाव ऊस संशोधन केंद्र येथे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक गटामध्ये या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घेऊन ऊस उत्पादन वाढवावे, असे आवाहन शेरकर यांनी केले.

## नारायणगावात नागपंचमी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव येथे नागपंचमी महोत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पारंपारिक नागपंचमी सणाला सांस्कृतिक, मनोरंजनात्मक आणि सामाजिक उपक्रमांची जोड देण्यात आली होती. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांचा, विशेषतः महिलांचा आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. महोत्सवाची सुरुवात मल्लखांबाच्या नेत्रदीपक प्रात्यक्षिकांनी झाली. मल्लखांब संघातील कलाकारांनी सादर केलेल्या विविध कसरती, संतुलन आणि कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिके पाहून उपस्थित नागरिक थक्क झाले. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या खेळाडूंचे कौतुक केले व त्यांना भरभरून दाद दिली. महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरला तो महिलांसाठी आयोजित केलेला 'होम मिनिस्टर' हा खेळ. सुप्रसिद्ध निवेदक बाळकृष्ण नेहरकर यांनी आपल्या बहारदार आणि खुसखुशीत शैलीत या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विविध मजेशीर आणि मनोरंजक खेळांमुळे महिलांचा उत्साह द्विगुणित झाला होता. या स्पर्धेत रेश्मा पराग छल्लारे, दुर्गा महाजन, राधिका महेश पाटील आणि वंदना प्रकाश जाधव यांनी बाजी मारत 'पैठणी'चे मानकरी होण्याचा मान मिळवला. विजयी महिलांना आकर्षक पैठणी साडी देऊन सन्मानित करण्यात आले. या पैठणी साड्यांचे सौजन्य पैठणी अध्यक्षा अंजली सचिन जंगम यांच्याकडून लाभले होते. तसेच, महोत्सवातील 'लकी ड्रॉ'ने सर्वांची उत्सुकता वाढवली होती. या लकी ड्रॉमध्ये सुरभी वर्मा यांनी प्रथम बक्षीस (मार्बल टॉप डायनिंग टेबल), निकिता वाडवणी यांनी द्वितीय बक्षीस (वुडन कपाट) आणि विद्या मावळे यांनी तृतीय बक्षीस (ड्रेसिंग टेबल) जिंकले. लकी ड्रॉसाठी जवाहरशेठ गुगळे आणि अजय चोरडिया यांचे विशेष सहकार्य लाभले. महोत्सवाच्या निमित्ताने उभारण्यात आलेला 'नागपंचमी लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी सेल्फी पॉईंट' हे उपस्थितांसाठी एक विशेष आकर्षण ठरले. अंजली सचिन जंगम यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून तयार झालेल्या या सेल्फी पॉईंटवर फोटो काढण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.



## गुंतागुंतीच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे महसूलमंत्र्यांचे आश्वासन

■ चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील खराबवाडी येथील गावठाण कायम ठेवण्याच्या मागणीसंदर्भात मुंबईतील मंत्रालयात एक महत्त्वाची बैठक संपन्न झाली. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत स्थानिक नागरिकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन या गुंतागुंतीच्या प्रश्नावर सकारात्मक आणि योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले. या नियोजित बैठकीला महसूल विभागासह संबंधित शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खराबवाडी गावठाण हद्दीतील मिळकतींचे अधिकार, अतिक्रमणे आणि त्यांच्या नियमितीकरणा सारख्या अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यावर सर्वांनी भर दिला.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केले की, 'स्थानिक नागरिकांच्या हिताचा विचार करून या प्रश्नावर सकारात्मक आणि योग्य तोडगा काढण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने केली जाईल.' नागरिकांना धीर देत त्यांनी याप्रकरणी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. खराबवाडी गावठाणाचा हा महत्त्वपूर्ण प्रश्न शासन दरबारी मार्गी लावण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष संदीप सोमवंशी व खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी उपसभापती क्रांती सोमवंशी यांनी पाठपुरावा केला होता.

# घनकचरा व्यवस्थापनावर निघणार मार्ग : गटनेते नितीन गोरे

■ चाकण (दै. संध्या)

गेल्या तेरा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (पीएमआरडीए) चाकण, राजगुरुनगर नगरपरिषदांसह परिसरातील १७ ग्रामपंचायतींसाठी मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. एमआयडीसी क्षेत्रातील पॉइंट क्रमांक ४ येथे ईएसआर जवळील ३६.५० एकर जागा या प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आली आहे. वाढते नागरीकरण आणि औद्योगिक विस्तारामुळे चाकण व खेड परिसरातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला होता. यावर उपाय म्हणून राज्य शासनाच्या निर्देशानुसार एमआयडीसी प्रकल्पासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणार असून, पीएमआरडीए मार्फत मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. या संदर्भात पीएमआरडीएच्या आकुर्डी येथील मुख्यालयात १७ गावांचे सरपंच, प्रशासक, ग्रामविकास अधिकारी, एमआयडीसीचे अधिकारी तसेच नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त आढावा बैठक पार पडली. या बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाच्या कार्यपद्धतीसह संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहभागाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित प्रक्रिया केंद्र हे संबंधित १९ शहरे व गावांच्या २० किलोमीटरच्या अंतराच्या आत असून, बहुतांश ठिकाणे ३ ते १८ किलोमीटर अंतरावर असल्याने कचऱ्याची वाहतूक सुलभ होणार आहे. संबंधित नगरपरिषद व ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलित करून त्याचे १०० टक्के वर्गीकरण करून तो मध्यवर्ती प्रक्रिया प्रकल्पापर्यंत पोहोचवणे आवश्यक राहणार आहे.



पुढील ३० वर्षांच्या लोकसंख्या वाढीचा विचार करून प्रकल्पाची क्षमता निश्चित केली जात आहे. प्रतिव्यक्ती प्रतिदिन ३५० ग्रॅम कचरा निर्मितीचा दर गृहीत धरून प्रकल्पाचे नियोजन केले आहे. कचरा प्रक्रियेसाठी ग्रामपंचायतींना प्रतिटन निश्चित टिपिंग फी अदा करावी लागणार आहे. प्रकल्पात सहभागी होण्यासाठी ग्रामपंचायतींनी रीतसर ठराव मंजूर करणे आवश्यक आहे. कचरा वाहतुकीसाठी १५ वा वित्त आयोग, स्थानिक स्वनिधी किंवा सीएसआर निधीतून वाहने उपलब्ध करून घेण्याचे नियोजन आहे.

या बैठकीस महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पीएमआरडीएचे मुख्य अभियंता रिनाज पठाण, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे तसेच विविध गावांचे सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> “ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या निधीतून कचरा वाहतूक वाहने खरेदी करणे शक्य नाही, त्यांना सीएसआर निधीतून वाहने उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडून विशेष सहकार्य केले जाणार आहे.”
>
> **- नितीन गोरे, नगरसेवक, चाकण**
>
> “ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या निधीतून वाहने घेणे शक्य नाही, त्यांना सीएसआरमधून वाहने उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सहमती दर्शविली आहे. त्यामुळे चाकण व खेड एमआयडीसी परिसरातील ग्रामपंचायतींसह अधिकाधिक स्थानिक स्वराज्य संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवून आवश्यक ठराव मंजूर करावेत.”
>
> **- आ. बाबाजी काळे, आमदार, खेड**

### भार कमी होणार

“मध्यवर्ती प्रकल्पामुळे ग्रामपंचायतींचा कचरा व्यवस्थापनाचा मोठा भार कमी होणार असल्याने जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी या व्यवस्थेत सहभागी होण्याची गरज आहे.”

### घंटागाड्या उपलब्ध

“चाकण व खेड परिसरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून गंभीर बनला आहे. आता त्यावर कायमस्वरूपी तोडगा निघण्याच्या दिशेने पाऊल पडले आहे. १५ वा वित्त आयोग, स्वनिधी आणि सीएसआर निधीतून काही ग्रामपंचायतींना घंटागाड्या उपलब्ध झाल्या आहेत.”